
- वर्ष: ६ वे
- अंक: ९ वा
- सप्टेंबर २०२१
- किंमत: ४० रूपये

मासिक

# शिक्षणयात्री



## पेन आणि छुरी....

### विना अनुदानित शिक्षकाची संघर्षमय जीवन कथा

# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा ५०० ते १००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.

६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट – शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

संपर्क :शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे चलभाष : 8208301001 shikshanyatri11@gmail.com

## संवाद



*सुभाष कुलकर्णी*
*संपादक*

### शिक्षकहो..... प्रतिष्ठा सांभाळा !

कालपरवा शिक्षकांची 'शाळेतच पार्टी' या आशयाची बातमी दूरचित्रवाणीवर पहायला मिळाली. शाळेतच स्वंयपाकगृहात मटनासह पार्टी करतांना शिक्षक पहायला मिळाले. अशा शिक्षकांचा सर्वत्र निषेध झाला, टीकाही झाली. एव्हाना गव्हा मिळता किडेही रगडते असला काहीसा प्रकार होऊन 'कर्त्या' शिक्षकांसोबत साऱ्या शिक्षणक्षेत्राकडेच बोट दाखवले गेले.यामुळे सगळ्याच शिक्षकांना मान खाली घालण्याची वेळ आली.

घडल्या प्रकाराने शिक्षकपदाची चर्चा झाली.शिक्षक ज्ञानदानाचे कार्य सोडून इतरही वेगळे व्यवसाय सांभाळतात असे आरोपही झाले.यात तथ्यही असले तरी साऱ्याच शिक्षकांना एका माळेत ओवणे बरोबर नाही. कारण गरीब वर्गातील मुलांना ज्ञान देण्याचे धडे देणारा शिक्षक विशेषत: जिल्हा परिषद शाळांत झोकून काम करतोय हेही तितकेच खरे आहे. वंचित घटकातील मुलांना स्वत: पदरमोड करुन शैक्षणिक साहित्य देणे असो,शाळेची वीज सुरळीत रहावी म्हणून स्वत: वीज बील भरणं असो अशा विविध खर्चिक बाबी तुटपुंज्या अनुदानातून जुळवतांना त्यांच्या नाकी नऊ येते. मात्र व्यवस्थापन व्यवस्थित कसे राहिल याकडे शिक्षकांचे कटाक्षाने लक्ष असते. सोबत मुलांचा अभ्यास,वर्ग सांभाळत गुणवत्तापुर्ण शिक्षणाचा आग्रह धरणारी शिक्षकमंडळीही आहे.

अशैक्षणिक कामाचे ओझे वागत ज्ञानदानाचे धडे देणारा शिक्षक समाजात असतांना दोन-चार घटनांनी साऱ्याच गुरु वर्गाकडे बोट दाखविणे चुकीचे आहे. असे उडदामाजी काळे गोरे असतातच. सकारात्मक होऊन शिक्षकांच कार्य पहायला हवे. आणि शिक्षकांनीही आपली प्रतिष्ठा टिकावी म्हणून काळजीने वागायला हवे.

तूर्तास एवढेच!

# अंतरंग


**प्रतिष्ठा शिक्षकांची**
डॉ.ह.ना.जगताप / ३

**गुरूजी तू मला आवडलास**
युवराज माने / ४

**पेन आणि छूरी**
युवराज पवार / ७

**शामची आई–कथा अभिवाचन**
**एक प्रज्वलित संस्कार यज्ञ**
सुनिल मोरे / १३

**शामची आई–कथा अभिवाचन**
सारीका रंधे / १६

**सिमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल**
गुलाब बिसेन / १७

**पायाभूत भाषिक व गणितीय साक्षरता**
दत्तात्रय खंदारे / १९

**आठवणीतले शिक्षक**
चेतन पाटील / २१

**आकर्षक सापळा**
डॉ.नंदा हरम / २२

**हरवलेल्या पोळ्याच्या आठवणी**
किरण डोंगरदिवे / २३

**माझी कविता**
रमेश राठोड / २०



**समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...**

मासिक **शिक्षणयात्री**

।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

वर्ष : ६ वे अंक: ९ वा सप्टेंबर २०२१

**वार्षिक:रू.४००/-** **द्वैवार्षिक:रू.७००/-**
**त्रैवार्षिक:रू.१०००/-**

मार्गदर्शक
मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)

मानद संपादक
सुभाषदादा कुलकर्णी

उप संपादक
संदेश नंदकिशोर हजारे

संपादन सहाय्य
डॉ.दिपक बाविस्कर
डॉ.युवराज पवार

अंक जुळणी
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

मुद्रितशोधन
डॉ.युवराज पवार

मुखपृष्ठ
जि.प.शाळा वडेल (आंबे) ता.शिरपर जि.धुळे

कार्यालय प्रमुख
जगदीश पाटील

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.
Online पेमेंट साठी – खाते नाव–शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे
संपर्क पत्ता– संपादक शिक्षण यात्री
क्रांतीनगर मु.पो.ता.–शिरपूर जि–धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)


**प्रतिनिधी सहाय्य**
**पुणे-** रमेश काळे,
**मुंबई-** जयपाल गिरासे,
**नाशिक-**किरण पाटील,
**सोलापूर-** उमेश काळे,
**औरंगाबाद-** रवि गारूडकर,
**परभणी-** युवराज माने,
**जळगांव-** प्रविण माळी,
**नंदुरबार-** तुकाराम धनगर,
**अमरावती-** रूपेश माने,
**कोल्हापूर -** गुलाब बिसेन,
**सातारा -** विनोद भोजने,
**बीड -** अनंत दिक्षित,
**लातूर -** पंढरीनाथ चिभडे,



**लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.**

## प्रतिष्ठा शिक्षकांची

शिक्षण दिन निमित्ताने ....



डॉ.ह.ना.जगताप
सोलापूर

एकदा एक अफगाण व्यापारी आपले १२ उंट घेवून एका नोकरासह उंट विक्री करायला निघाला होता. परंतु मध्येच खूप अंधार पडला रात्र झाली. थोडेसे धुळीचे वादळ सुरु झाले म्हणून त्या व्यापाऱ्याने मुक्काम करायचे ठरविले. त्यासाठी छोटी तंबूची राहुटी ठोकली. नोकराला उंट बांधून ठेवायला सांगितले. नोकराच्या लक्षात आले की, आपल्याकडे तर ११ खुंट्या आहेत आणि उंट तर १२ आहेत. एक उंट जर बांधला गेला नाही तर या वाळवंटामध्ये तो कोठेतरी भटकेल. त्याने ही गोष्ट भीतभीतच मालकाला सांगितली. मालक आपल्यावर रागावतील अशी त्याला भीती वाटत होती. परंतु तसे झाले नाही. मालकाने नोकराला सांगितले की, 'ठीक आहे' असे कर अकरा उंटांना खुंट्या ठोकून बांधून ठेव परंतु त्यांच्या मध्ये एका उंटाला केवळ खुंटीजवळ नेऊन खुंटी ठोकल्याची कृती कर व पुढे जा. त्याप्रमाणे नोकराने केले. तरी नोकराला भीती वाटत होती की, ज्या उंटाला बांधले नाही तो निघून जाईल. परंतु सकाळी उठून पाहिले तर तसे काही झाले नाही असे त्याच्या निदर्शनास आले. त्याला आश्चर्य वाटले की, आपल्या मालकाला हे कसे समजले असेल म्हणून त्याने मालकाला विचारले त्यावेळी मालकाने सांगितले की, अरे त्या उंटाला, आपल्याला बांधलेले, असा भ्रम झाला त्यामुळे तो उंट तेथेच थांबला. असाच काहीसा भ्रम. आपल्या शिक्षक बंधू भगिनींचा झालेला आहे. त्यांना उगाचच असे वाटते की, आपल्याला समाजात प्रतिष्ठा नाही. वास्तविक तशी परिस्थिती नाही. पूर्वी शिक्षकाला समाजात खूप मोठे स्थान होते व आता ते स्थान नाही ही एक कल्पना आपण कुरवाळत बसतो. वास्तविक पूर्वी समाजाला शिक्षक हाच एक माहिती चा स्त्रोत उपलब्ध होता. आज मात्र ज्ञानाचे स्त्रोत खूप उपलब्ध झालेले असल्याने समाज शिक्षकावर त्या दृष्टीने अवलंबून राहिलेला नाही.त्यामुळेही शिक्षकांची अशी धारणा झालेली असावी.समाजामध्ये इतर लोकांना मान आहे व आपल्याला नाही असाही न्यूनगंड काही माझ्या शिक्षक बाधवांमध्ये आढळतो. परंतु वस्तुस्थिती तशी नाही वास्तविक दिवसेंदिवस कोणीच कोणाला फार मान देतात असे दिसत नाही. केवळ आपले ज्याच्याकडे काम आहे त्याला तात्पुरता मान देण्याची प्रवृत्ती समाजामध्ये रुजत चाललेली आहे. पूर्वीसारखा भाबडेपणा आता दिसत नाही. दोन नंबर धंदेवाले लोक पोलिसांना, आजारी माणसे डॉक्टरांना, शासकीय नोकर आमदार मंत्र्यांना मान देताना दिसतात. त्यामुळे शिक्षकांनी अशी समजूत करून घेण्याचे काही कारण नाही. समाजाचा आजही शिक्षकावर व शिक्षण व्यवस्थेवर खूप विश्वास आहे. अलिकडच्या 'हम दो हमारे दो' जमान्यात मुले ही अत्यंत लाडकी असतात आणि असे असूनही पालक आपली मुले शिक्षकांच्या ताब्यात देतात. कारण त्यांचा असा विश्वास असतो की, हे शिक्षकच माझ्या पाल्याचे कल्याण करणार आहेत. आणि आपण शिक्षक या नात्याने या विश्वासाला तडा जाणार नाही असे वर्तन करणार नाही. त्यामुळे शिक्षकाने आपल्या व्यवसाया बद्दल, आपल्या शिक्षण व्यवस्थे बद्दल सतत अभिमान बाळगला पाहिजे. समाजामध्ये आपणास अधिकची प्रतिष्ठा पाहिजे असेल तर आपली उपयुक्तता व आपले व्यवसायिक कौशल्य प्रभुत्व आपण सिद्ध केले पाहिजे. माझे विद्यार्थी, पालक, माझे सहकारी, माझे वरिष्ठ माझ्याबद्दल काय बोलतात हेच सर्वात महत्वाचे आणि हाच आपल्या प्रतिष्ठेचा मापदंड आहे हे प्रत्येकाने ध्यानी घ्यावे.

संपर्क -९८२२६१५४६४

आनंदाचं झाड

# गुरुजी, तू मला आवडला ...



युवराज माने

परभणी

आज शाळेत पोहोचलो.व्हरांड्यात मुलांचा घोळका उभा होता.चौथ्या वर्गातील काजलला खेळताना पायाला काहीतरी लागलं त्यामुळे ती मोठ्याने रडत होतीं.रेश्मा,जया तिला समजावत होत्या.मोठ्या वर्गातील मुलं तिच्या पायाला पट्टी बांधत होते.इतर मुलं हे सर्व डूकूडूकू पाहात होते.मुलंच मुलांना किती छान समजून घेतात.लहान मुलांची मोठी मुलं अशी काळजी घेत आहेत हे पाहून मनाला बरं वाटलं.परिपाठाची घंटा झाली.मुलांनी सुंदर परिपाठ सादर केला.मुलं रांगेत आपापल्या वर्गात जाऊन बसली.शाळा सुरू होऊन साधारण दोन महिने झाले होते.या दोन महिन्यांमध्ये माझ्या वर्गात 'छोटे छोटे नवे अंकुर' डोलू लागले होते. ह्या नव्या अंकुरांसोबत 'संवादाचा सेतू' उभारला अन, सुरू झाला वेगवेगळ्या कल्पनांचा संवादरुपी प्रवास.गेल्या दोन महिन्यापासून वेगवेगळ्या कृतीच्या माध्यमातून नुसत्या गप्पाच गप्पा सुरू होत्या.मुलांच्या मनातील कल्पनांचे अनेक अविष्कार पाहायला मिळत होते.सहल गाडीतून परिसरातील सहली सुरू होत्या.मुलं त्यांच्या शैक्षणिक जीवनातील हे 'पहिलं पाऊलं ' माझ्यासोबत टाकत होते.मी ही त्यांच्यातलाच एक प्रवासी आहे असं वाटत होतं.माझ्या बालपणात राहून गेलेल्या गोष्टी यांच्यासोबत पूर्ण करत होतो.सेवेच्या आरंभापासून सतत वरच्या वर्गातील मुलांसोबत शैक्षणिक प्रवास सुरू होता,त्यामुळे तेथील अनुभवही वेगळ्या स्तरातील होते.मागील बारा-तेरा वर्षाच्या कालावधीमध्ये अनेक विद्यार्थी माझ्या जीवनात आली.खूप काही भरभरून देऊन गेली.काही लेकरांनी आपल्या नावाचा मनावर कायमचा ठसा उमटवला.याच विद्यार्थ्यांनी मला 'श्रीमंत' केलं. अनेक प्रसंगी माझ्या मनाचा तळ ढवळून काढला. अनेकदा मोडून पडणाऱ्या प्रसंगी हे माझे चिमुकले माझा



आधार बनले.अगदी मृत्यूच्या दारातुनही माझ्या या चिमुकल्यांनी मला परत खेचून आणलं.अन,मला पुन्हा लेकरांसाठी काहीतरी करण्याची संधी दिली....

'शाळा' म्हणजे मुलांच्या अंगणातलं 'आनंदाचं झाड' झाले पाहिजे.हे मला पहिलीतील चिमुकल्यासोबत नव्याने शैक्षणिक प्रवास करत असताना जाणवू लागलं.याशिवाय मुलात कार्य करायचं म्हणजे मुलांच्या आई-बाबाप्रमाणे विश्वास निर्माण करायला हवा. हे मला कळून चुकलं. आणि असाच विश्वास प्राप्त होऊ लागला.वर्ग पहिलीत आल्यापासून मी केवळ श्रोत्याच्या भूमिकेत असतो.खरं सांगू सकाळी वर्गात प्रवेश केल्यानंतर मला माझ्या वर्गातील या महान वक्त्यांची मनोगतं ऐकून घ्यावे लागतात.एकालाही नाउमेद करता येत नाही.प्रत्येक चिमुकल्यास दररोज मला काहीतरी सांगायचं असतं. घरात घडणाऱ्या अनेक घटना ते जशाच्या तशा वर्गात सांगतात. घरी नव्याने एखादी म्हैस, बकरी विकत आणली असेल तेही सांगतात किंवा एखाद्याच्या घरी गाईने पिल्लू दिला असेल, एखाद्याच्या घरी एखादी नवीन वस्तू खरेदी केली असेल, गावात एखादी मोठी गाडी येऊन गेली असेल किंवा घरात आई बाबांचे भांडण झालं असेल, गल्लीत कोणी कोणाला शिवीगाळ केली असेल अशा सर्व गोष्टी न घाबरता सांगत असतात. मला दाखवण्यासाठी घरून येताना काही ना काही शाळेत आणतात.वर्गातला पहिला तास दाखवण्याचा 'सोहळाचं' असतो जो नित्यनेमानं वर्गामध्ये भरत असतो. नवीन आणलेल्या बांगड्या, कपडे किंवा हातावर काढलेली मेहंदी मला दाखवल्याशिवाय ती मुलांच्या मनात रंगतच नाही.जेव्हापासून मी त्यांच्या जीवनात प्रवेश केलाय तेव्हापासून त्यांना माझ्याप्रती असा विश्वास आला आहे की ,आपलंही कुणीतरी ऐकून घेणारं आहे  आपल्यालाही कुणीतरी समजून घेतोय म्हणून मी शाळेमध्ये त्यांच्या प्रत्येक मताचा आदर,सन्मान राखण्यासाठी प्रयत्न करतोय.त्यांची मन जपतोय. प्रसन्न सकाळी गावात पाऊल ठेवताच इटुकली पिटुकली मुलं-मुली तयार होऊन पळत पळत माझी बॅग घेत मिठी मारतात...सकाळी शाळेत आल्याबरोबर प्रत्येकाची चढाओढ लागलेली असते मला सांगण्याची,दाखवण्याची. किती सांगू आणि कसं सांगू असं त्यांना होतं.एक मात्र खरं, या प्रत्येक चिमुकल्याला कळून चुकलंय की, 'शाळेमध्ये मला बोलू दिले जाते व माझ्या मनातील सर्व गोष्टी ऐकून घेणारं एक ठिकाण मला मिळालंय.ते म्हणजे 'माझे गुरुजी'!  आणि खरं सांगू या चिमुकल्यांचा खरा 'हिरो' त्यांचा शिक्षकच असतो बरं. तो प्रत्यक्ष त्यांच्या समोर उभा असतो.ते प्रत्येक गोष्ट त्या हिरोची ऐकत असतात.ते सांगतील त्याप्रमाणे वागत असतात.हा विश्वास या चिमुकल्यांचा आपल्या शिक्षकावर असतो.

'उमलती मने प्रज्वलीत करणं हे शिक्षकांसमोर महान जीवितकार्य असतं.'आणि तेच कार्य आपल्या स्वतःच्या हातून घडत असताना व मुलांच्या जीवनातील 'बालपण' पायाचा दगड असतो हे सदैव डोळ्यासमोर लक्षात ठेवून या लेकरांना सर्वंकषपणे कसे तयार करता येईल याचाच विचार करत नित्य नव्या दमान चिमुकल्यांच्या पंखात बळ भरण्याचं काम करण्याची संधी मला मिळाली यापेक्षा आणखी मोठं काम ते कोणतं!असं आमच्या दररोजच्या व्यवहारातून वाटत राहतं शाळेतल्या प्रत्येक लेकरांत मला माझी स्वतःची मुलं (तन्मय,प्रयास ) दिसतात ...

मुलांचा आपल्या शिक्षकावर जीव असतो. त्यांच्यासाठी सतत काही ना काही करावं असं त्यांना वाटतं.माझेही चिमुकले याला अपवाद नाहीत.सकाळी शाळेत आल्याबरोबर आपल्या गुरुजींना छान वाटावं म्हणून वर्गाच्या दरवाज्यात सुंदर रांगोळी माझे हे चिमुकले न विसरता काढतात. कल्याणी आपल्या गुरुजीच्या टेबलावरील वस्तू व खुर्ची व्यवस्थित करून ठेवते.नम्रता आपल्या घरच्या गुलाबाची व मोगऱ्याची फुलं टेबल व खुर्चीवर न विसरता मांडते.ममता आपल्या घरची कोणती ना कोणती खायची वस्तू माझ्यासाठी मुठीत बांधून घेऊन येते.अर्जुन आपल्या शेतातलं चिंच,बोरं,शेंगा असं काही ना काही सतत आणत असतो.खुशी आणि साक्षीच्या डब्यातील एखादा तरी घास मला खावा लागतो.स्वाती आपल्या डब्यात कधी मासोळी,अंड्याची तुकडे आणते आणि जाणीवपूर्वक मला सांगते. ईश्वरी,शितल,रेश्मा

आपला वर्ग कसा स्वच्छ राहील याचा प्रयत्न करतात. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत त्यांच्यासोबत बसून मी जेवण करावं असं त्यांना सतत वाटतं.आणि आमची पंगतही चांगली रंगते.मी एकही दिवस घरी राहू नये असं त्यांना वाटतं, कारण त्यांना माझ्याशिवाय शाळेत करमत नाही.असं प्रत्येकाच्या मनात माझ्याविषयी काही ना काही असतं.त्यांच्या मनाचा हा ठाव घेऊन त्यांच्यासोबत वागावं लागतं. 'मुलांनी असंच राहायला हवं एखादा झुळकेसारखं,मुक्त ,मनमौजी...आपल्या गुरुजीवर त्यांनी हक्क दाखवायलाच हवा....'

सकाळच्या वेगवेगळ्या कृती आटोपून दुपारी चित्रगप्पासाठी आम्ही गोलाकार स्थितीत बसलो होतो.माझ्या आजूबाजूला बसण्यासाठी मुलांची चढाओढ असते.चढाओढीत दररोज नवीन मुलं जिंकतात. गुरुजींच्या आजूबाजूला जागा मिळणं म्हणजे मोठ बक्षीस मिळवणं असंच लेकरांना वाटायचं.आणि हे सगळे अगदी सहजपणे चालू असायचं.हेच मुलांना फार आवडायचं.कुठलीही भीती किंवा दडपण लेकरांना नव्हतं. हे अगदी शाळेच्या पहिल्या दिवसापासून मुलं अनुभवत होते.आमचा गप्पांचा तास अगदी रंगात आला होता.आपल्या मनातील सर्व भावना अगदी न घाबरता प्रत्येकजण बोलत होतं.मी सर्वांचं मन लावून ऐकत होतो.अचानक ममता उठली आणि म्हणाली, गुरुजी ,तु मला आवडलास . हे ऐकून पूर्ण वर्ग स्तब्ध झाला.मी ममताकडे पाहतच राहिलो.या चिमुकल्या डोळ्यातील तेज आणि चेहऱ्यावरील माझ्या प्रतीचे भाव पाहून मी अंतर्बाह्य उजळून निघालो.आज जीवनातील सर्वोच्च आनंदाचा क्षण अनुभवला... ममताच्या पाठोपाठ प्रत्येक चिमुकलं उठून उभा राहू लागलं आणि तेही म्हणू लागलं ,गुरुजी,मला पण तु आवडला. मुलांच्या कोमल मृदू हृदयातून निघणारे हे शब्द आजही या ठिकाणी व्यक्त होताना तसेच कानामध्ये रुंजी घालत आहेत.ज्या चिमुकल्यांच्या जीवनात अद्याप कुठल्याही विकाराने प्रवेश केला नाही अशा पवित्र आणि शुद्ध मनाने आपल्याला मनापासून स्विकारावं आणि न घाबरता,कुठल्याही हेतू न ठेवता शब्द बाहेर पडावेत, गुरुजी,तू मला आवडलास. एखाद्या बालमनाला आपण मनापासून आवडावं आणि त्यांन उचित सन्मान करावा ही अतिशय उच्च कोटीतील घटना प्रत्यक्ष अनुभवताना एक वेगळा आनंद जीवनात आला... मागील दोन महिन्याच्या सहवासात लेकरांनी माझ्यातील 'गुरुजीला'ओळखलं आणि आज त्यांनी प्रत्यक्ष स्वीकारलं व प्रत्यक्ष व्यक्त करून दाखवलं.आमचा सुरू झालेला आनंददायी शिक्षणाचा प्रवास एका सुंदर वळणावर येऊन थांबला.एकदा का मुलांनी आपल्या गुरुजींना स्वीकारलं की पुढील सर्व प्रवास सुकर होतो.मुलांची मनं जिंकण्यात आज मी यशस्वी झालो होतो.जीवनातलं फार मोठं सुख आज मी पदरात पाडून घेतलं होतं.जगातला सगळ्यात श्रीमंत माणूस आहे याची प्रचिती आली.

'शिक्षकाची भूमिका ही एखाद्या सीडीसारखी असते.'प्रत्येकजण या सीडीचा उपयोग आपल्या जीवनात उंची गाठण्यासाठी करत असतो.पण ही सीडी आपल्या जागी घट्ट उभी असते.आपणही अशीच आपल्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक मुलाची खंबीर सीडी आहोत याची जाणीव होऊन गेली.लहान मुलांना त्यांच्या मनोभावना ओळखून सन्मानाची वागणूक दिली तर किती छान त्यांचे प्रतिबिंब लक्षात येते.स्पर्शाची भाषा कळणं म्हणजे हृदयाची भाषा कळणं होय.असा मायेचा स्पर्श गुरुजींच्याकडून मुलांना व्हायला हवा ...मग प्रत्येक मुलाच्या तोंडून बाहेर पडेल ,गुरुजी, तू मला आवडलास.

**(युवराज माने हे उपशिक्षक म्हणून जि प प्रा शाळा पारडी ता.सेलू जि परभणी येथे कार्यरत.)**

संपर्क – ७५१७४७८५७०

**(सदरील लेख युवराज माने यांच्या 'गुरुजी,तू मला आवडला' या पुस्तकातून घेतला आहे.)**

## मुखपृष्ठ कथा...

# पेन आणि छुरी....



**युवराज पवार**
कापूसवाडी-जळगांव

पांढरी तांड्यातल्या, उभ्या गल्लीत.बायका,पोरी बाजीवर, खाटीवर वल्ले चिल्ले कपडेलत्ते, धान्य, वड्या, पापड, चिपड दाळ दानोडा वाळायला टाकून,निवांत, आपापल्या घरात काम करत बसतात.. शेळ्या बकऱ्या सोडायची वेळ अन त्यांची वाळत घालायची वेळ एकच....जरा मागून पुढं घालावं म्हणजे कोणाच्याही सामान सुमनाची नासाडी होत नाही.... शेळी बकरी म्हणजे एक नंबरची हाडकी हावरट.. इथ तोंड घाल. तिथं तोंड घालनारी..चबरी जात...लोकांना का माहीत नाही. पण मुद्दाम टाकून ठेवतीन पाहयटे पाहयटे, शेळ्या बकऱ्यानी जरा कुठ तोंड लावलं..की, सुरू झाला दांगोडा..मुक्क जित्रब निघून जातं... पण मालकाच्या गळ्यालाफास...या काचापाई का...आपला व्यवसाय सोडून द्यायचा का.? हत्ती चले बजार..कुत्ते भुके हाजार.. तसी आपली गंमत. अंगणात आणि गल्लीत कोणी कोणी काय काय टाकल आहे? उभ राहून संजू पाहत, विचार करत होता.. आपल्या बकऱ्या शेळ्यांमुळे शेजाऱ्या पाजाऱ्यांच नुकसान होऊ नये...या काळीज चिंतेने,संजून लेकरांना, जोरान हाक मारली.. अय सई.., धाट धाट.. बकरा पकड पकड , चालेनी ये..छोरी सई..... अय.. पिकू.. पिकूरे... धाटनी धाट.. साळे कत्त मर्गे रै..सारिर सारी.., रे उ फुटकी कुणसे दल्डाम भरागी रे बापू.. ,दाना फान हेगेनि रे सारी बची बच्चा अयपिकू.अय. सई .. हाक देऊन ही पोरं अजून कसे आले नाही. बकऱ्या सोडता सोडता संजू जोरजोरान ओरडू लागला..बापाची रागान भरलेली तुकारी कानावर पडताच साताट वर्षाचा पिकू कुठून तरी धावत आला.चिडलेल्या रागावलेल्या बापावर, इवले इवले खुनशी डोळे काढत, हातवारे करत, दातओठ खात म्हणू लागला. ''का बरका ...रोछ साळो इ ..,मन रमे बी देयनी... इ बकरा पकड..., ऊ बच्चा पकड...केव छ....काम करेन लगा व छ मन... साळो... सवता का करेनी काम ... हामेन करेन लगाव छ.. इ काई बाप छ...आसो खाटो बडस...'' ''धाटगोनि रेड वांद्रा....''एका जागी खंब्यावाणी ताट उभा राहून काहीतरी बडबडणाऱ्या पिकूवर तो पुन्हा मोठ्यानं खेकसला. वांद्रा केरो छ रे मन... स्वतःशी बडबडत तो बोकडे थोपवून धरण्यासाठी धावला.तशी सई आणि तिची मायसती,त्याच्यामागोमाग घरातून बाहेर येत पळाल्या.... संजून खुटयावरून सोडलेले बोकडे दणादणा कुद्या घालत खेळू लागले. जोरजोराने उड्या मारत धिंगा मस्ती करत गल्ली बोळातून वाट मिळेल त्या रस्त्याने सैरभैर पळू लागले. गल्लिभर त्यांच्या कुदन्या कादन्याचा धडधड आवाज घुमू लागला. त्यांच्या खुरान उडणारी माती फुफाटा , वाळायला टाकलेल्या वल्या चिल्ल्या कपड्यालत्त्यावर जाऊन हळुहळु बसू लागला.पुढं पुढे धिंगा मस्ती करत, दणदण उड्या मारत बेछूट धावणाऱ्या त्या हिडग्या बोकड्यांना क्षणभर थोपवून धरण्यासाठी त्याचे बायको पोर

धावू लागले.मागे मागे धावत येणाऱ्या पोरांना पाहून एक बोकड्या सारकी मोठ याडीच्या घरात घुसून दुल्डीतील भाकर खाऊ लागला.दुसरा भुरा मामाच्या पांढऱ्या स्वच्छ ढवळ्या मातीन सारवलेल्या न्हाणीवर चढू उतरू लागला.त्याच्या पायखुरान न्हाणी आणि वट्याची ढवळी माती उकरून जाऊ लागली. वटा आणि न्हाणीची पार रया गेली.त्याच्या लेंड्या मुतान वटा आणि न्हाणी रंगली ती भलतीच विचित्र दिसू लागली. छानशा वट्याचा उकिरडा झाला. एक गवळी बकरी, आपली लहान लहान पिल घेऊन झामा नायकाच्या चक्कित घुसली,फरशीला चिटकलेल, पीठ जिभेन चाटू लागली.तर गवळा बकरा चक्कीच्या भीतीवर चढून, तिथं पांढऱ्या भीतीवर उगलेल गवत मोठ्या दिमाखान खाऊ लागला. सईन आडदांड असलेल्या एका गबदुल्ल्या बोकड्याचा कान पकडला.तो तिला फरफटत ओढत नेऊ लागला.पण तीही भलती चिक्कट एकच कान तीन दोन्ही हातानं पकडला होता. बोकडया तिच्यावर जीभ काढत एका पायान माती उकरून दूर फेकत नुसती बो बो बो करत होता. त्या बोकड्याच्या लेंड्या मुताचा आणि आंगाचा भलताच घाणेरडा गंदा उग्र वास त्या पोरीच्या नाकात जात होता.त्या उग्र वासान तिला मळमळी येत होती पण तो पळून लोकांच्या घरात घुसून कोणाच्या अन्नपाण्याची नासधूस करू नये म्हणून सईन त्याला पकडून ठेवल होत.तो मात्र तिला घडिघडी ढुसण्या मारत होता.स्वतःला सोडवू पाहत होता. सई त्याचा मार खात होती. बापा कधी येतो.त्याची आतुरतेने वाट पाहत होती. पिकून एका काळ्या गरदुल्या बोकड्याचा एक पाय कसाबसा पकडला.तो त्याला घसडत घसडत पुढे नेऊ लागला.तसा पिकू ही त्याच्या मागे मागे घसडल्या जाऊ लागला.तसा त्याला घसरघुंडीचा खेळ खेळण्याचा आनंद होऊ लागला. परंतु आता काळ्याला हालचालच करता येत नव्हती.पिकून त्याचा मागचा एक पाय फिट्ट आवळला.तीन पायावर तो कसबसा उभा राहिला. अन् तसाच मागे फिरुन फिरून त्याला मस्तक मारण्याचा प्रयत्न करू लागला.तो घडीभर शांत निवांत उभा रहावा. म्हणून पिकून त्याला आपल्या सर्व बळानिशी गच्च धरून ठेवला होता.काळ्या आणि त्याच्यात एक चोटापट सुरू झाली होती.तो तसाच उभा राहावा...म्हणून पिकू त्याच्याशी गोड गोड बोलू लागला.' अरेऽअरे मन मार मतनि रे. बापू ... तुतं महया सोब्ती हायन रे मी तुले कसी खिचळी चार्तो भो...मी.. तुहया सोबती हायेन..., बोल..बोल महयासी...'' पिकूच बोलण काही त्याच्या कानात शिरत नव्हत.त्याचे सारे सगे सोबती पुढं गेले होते.तो मात्रपिकूच्या पायाच्या कैचीत सापडल्यानं त्याला त्याच्या मित्रासारख्या उड्या मारता येत नव्हत्या.पळताही येत नव्हत.तो पिकूच्या तावडीतून स्वतःला सोडवून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता.दोघांचा हा भयंकर संघर्ष सुरू होता.दोन्ही पाय आणि हाताच्या कैचित बोकड्याचा मागचा एक पाय धरुन जमिनीवर लवण्या बसलेल्या पिकूला त्याच्या अंगाचा खारट वास येवू लागल.त्या उग्र वासान त्याची हलकीशी तंद्री भंगली.तेवढ्यात सप्पकण, डोक्याला, काळ्यान एक जोराची टक्कर मारली तसा पिकू जमिनीवर पालथा पडला.जमिनीवर पडलेल्या पिकूच्या तोंडावर काळ्यान मुताची एक जोरान पिचकारी मारली तसा पिकू जोरजोरान ओरडू लागला. ''आरे मुत दिनो रे साळो .....मुत दिनो मुंडेप..... हयाट छि छि.. अरे पकळो रे पकळो ऽ ... धाटो रे धाटो .. पहयारे पहया..., मारून टाकल न रे मले ऽऽ..... आसा कसा बाप हाये रे.. महया .... मही माय कुटी गेली रे..... मरलो रे... मर्लो आता.'' पिकूचा असा जीव तोडून काकळवांदा सुरु होता. त्याचे कपडे मपडे माती पुफाट्यान आणि मुतान भरून गेले होते. बोकड्याच मूत्र काही अंशी पोटात ही गेल्यानं त्याला नुसत्या कोरड्या ओकाऱ्या ही येत होत्या. काही का असेना दोन्ही भावंडानी दोन बोकड्यांना थोपवून ठेवल होतं . सती मात्र एका पळत्या बोकड्यामागे ''होय ... होय ... हर्र हर्र हर्र र्र आव आव .. हर्र .. र्र आव ... आव ककव ककव... करत पळत होती. तिचाही जीव रडकुंडीला आला होता. या अशा कामांन ती किदरून गेली होती....तेवढ्यात सईला ही बोकड्याने जोराची टक्कर दिली. ती धब्बकन जमिनीवर आपटली. तिची अंगी माती फुफाटयान भरून गेली .तिच्या हातातून निसटून गेलेला

बोकड्या आनंदान उड्या मारू लागला. पुढ पुढं पळत जावून सतीच्या समोर येवून दोन पायावर उभा राहून तिला मारू लागला. तिचा हात चाटून जीभ काढून ब्यॅ ी ब्यॅ ी बो ऽ बो .. करू लागला .संजूच्या बायको , पोरांचा तमाशा जग उघड्या डोळ्यान पाहत होतं . त्यांना ही जगाची फिकीर नव्हती बकऱ्या सोड बांधायच्या वेळी त्यांचे हाल हाल व्हायचे, झाडलोट पालापा लगट गोळा करण्यातच त्यांचा दिवस संपून जात होता . पोरं साबणान , माती,दगडान आंग घासून पुसून अंघोळ करत पण बकऱ्यांच्या लेंड्या मुताचा वास दिवसभर काही जायचा नाही, त्यांनाही आता या वासाची सवयच होऊन गेली होती.बकऱ्या एकेक दाणाफाण होऊन गेल्या. घाईघाई त्यानं खारी बकरी सोडून तिच्या गळ्यात भलबुर दोर गुंडाळला.विळा आणि पाण्याची बाटली घेऊन तो पळाला स ी त्ती... व. ...स ी त्ती....कुटी मर्ली वी..... रांड तू... तुहया बकरीन महीं भाकर भाजी खाल्लीन व.... फुकने.... पहय.. पहय... रोजच्च झालं व माय या बकल्ड्यांच ... लायेल दार उघळून घुसता मेले बार झवण्याचे .. तेंले पाय पोसनारे कुटी मर्ले ... पुन्हा सारकी मोठ याडीन तुकारी मारली. तिच्या तुकारीन गल्लीच्याही कानठळ्या बसल्या.लागोपाठच्या तुकारीची ढाय सतीच्या कानावर पडताच, तिच्या काळजात धस्स झालं. ती कशीबशी धडपडत सारकी मोठ्याडीच्या घराजवळ जाऊन पोहचली . व मोठी माय चूकभूल माफ करा व.. आता नि युव देणार लगे.. व ी मोठ्ठी माय सती गयावया करत बडबडली. व ी फुकने... भेरके..तू आस्सस म्हनती...मले म्हया भाकरी भरून दे.... रोजचस झालं व माय तुहया बकऱ्या यच.....वनवास आला मले....जीव कट्टायून गेला महया.. आसं वाटतं... घर सोळुन निंघुन जा..कुटी बी.. व...मोठ्ठीमाय थोळेच दिवस हाये हामू... आवळ सेन केलं..आजुक जरसिक कय काळून घ्या न माय.. हाव व फुटक्या झवण्याचे. आनून देते व माय महयाघरून ... सारकी मोठयाडीच तिन तोंड कासबस बंद केलं. किदर मर गये रे...बकऱ्या पालनेपोसनेवाले...हाट हाट..व चबरे झवने की... मीया चक्कीत घुसून गव्हाच दळण खाणाऱ्या बकरीला हाकलू लागला.बकरीला हाकलल की, तिचे पिल्लं त्या दळणावर जाऊन भिडत . बकरीच्या या डाबडूब्लिन मीया पार किदरून गेला.त्याला त्या बकरी पेक्षाही तिच्या मालकावर भयंकर राग आला. तोंडात येईल तस,तो बकवाना करू लागला.अनाप शनाप बकू लागला.त्याचा बकवाना एकून बारबुद्याच्या आडावर पाणी घ्यायला गेलेल्या केशर मामीला धडकीच भरली.पाण्याची खेप घेऊन ती कशी बशी घरी आली. तिकडून मियाचा बकवाना अन् इकडून केशर मामीचा तडफडा एकच झाला.सती कशी बशी थरथरत तिथं जाऊन पोहचली.आपल्या बकरीचा कारनामा पाहून तिन ही डोक्याला हात लावला... पाहय तूच... पाहय आता... तुहया बकरीन ..कसा सत्या नास कर्ला.. महया वट्याचा..न्हानीचा...सगडी न्हानी उकरून ठुली... मामी व सारवून दिंन्न मी..,आवळा घोर काव्हून लावून घ्येता जीवाले आन्हा तो फळा. मी वरच्याकून झाळून देत्ते.. माहया बकऱ्या गेल्या की मांग मी इन तहा महया हातानं मास्तन सारोयुन दिन... .. केशर मामीच्या हातातील झाडू घेऊन सतीन वरच्याकून उकडलेली जागा झाडून काढली. मातीचा पूंजा तिथच गोळा केला. दुखावलेल मामीच मन काही खूष झालं नाही.या निमित्तानं त्याना आपल्या मनातील भडास काढायला आयतीच संधीच चालून आली होती जीव लय कटायला गळ्या महया आता... लय रंजीस रंजिस झाली मी... कवा, कदि ,कोन्हाची बकरी त्त कोन्हाची कुतरी.. कधी मांजर त्त गावळी हायेस हाये..महय घर का सरकारी हाफिस हायेका...? जवा पायल तवा...कोन्हीबी हागुमुतून जातो...आपल काम सोळून निस्तरत रा दिवसभर... घरचं झालं थोळ तेच्यात याहयान धाळल घोळ सती कांनकोंडली झाली .तिचं ही अंतकरण तिळ तिळ तुटू लागल . ती पस्तावा करू लागली . संजूला पाहून झामा नाईकांची चक्की चालवणारा, मीया मोठ्यान गळा काढू लागला. व .. मामू मुक्का जान्वर हय.. उसको क्या समजता ... जिधर खानेको दिखा ..उधर भागते ....जांदो... क्यू जांदू रे मय भळवे... औरता के पिछे छुपते साले ... मेरा पिस्ना भरदे .. मुझे कुच मालूम नि

... मीया बेबीच्या देठापासून लालभडक झाला . इतना हय तो दरवाजा लगाके बैटना चक्की को ... बकऱ्या कायकू घुशेंग्या ... और गाल्या देरा ... साला ... आरेऽ .. भळवे . . मिया त्याला मारायला धावला .चक्कीच्या भितीवर चढून गवत खात असलेल्या बकऱ्याला आपण मागे राहिल्याची जाणीव झाली तसा तो कावरा बावरा होऊन,चक्कीच्या भिंतीवरून खाली उतरण्याचा प्रयत्न करू लागला पण त्याला उतरता येत नव्हतं .त्याची तगमग वाढली. मीयाशी बोलत ,उभ्या असलेल्या संजूला त्यानं पाहिल. तशीच त्यानं संजूच्या दिशेन उडी घेतली . उडी घेताना मात्र त्याच्या पायखुराच्या नकान पांढऱ्या मातीचा एक गोळा उकरून त्याच्या सोबतच खाली आला तो मियाच्या डोक्याला बसला. दगड संजूनच मारला ..? म्हणून मीया अधिक बोबलून म्हाझन करू लागला. म्हाझणान तांड्यातील लोक गोळा करू लागला. मार दालारेऽ मार दाला ...इस हरामिने.....भागोरे भागो..बचाव.बचाव कोई....या.. आ ल्ला ... डोक्याला दोन्ही हात लावून तो अंगात सोंग आणू लागला.मियाचे धंगडे पाहून संजू हळूच काना तिरपा झाला . सती मात्र त्याला समजावू लागली. शेजार पाजारची जमलेली माणस ही त्याला धीर देऊ लागली . दोन्ही भाऊ आपापले कपडे झटकत झुटकत उभे होते.आपल्या आईवडिलांना सगळेच शिवीगाळ करतात, मारायला धावतात पण आपले मायबाप समोरून हसून देतात.बोलण खाऊन घेतात.या तांड्यात सगळेच लोक आपल्या मायबापाची हेवा करतात.द्वेष करतात.तरीही आपले मायबाप विसरून जातात. मीया जसा वरडत होता. तस इवल्या पिकूच्या नाकपुड्या फुलत होत्या.त्याला त्याचा जीव घ्यावा अस वाटू लागलं. परंतु आपलीं माय त्याला समजून सांगते आहे. म्हणून तो निमूट उभा राहून त्याचा तमाशा पाहत होता. सई जाय बाई... मीया बुवासाटी यक गिलास पानी न यक कप च्या करून आन.... चहाच नाव काढताच मीया गार झाला.तो चहाचा भलताच शौकीन आहे. हे सतीला माहीत होत.चहा पिल्याशिवाय हा म्हातारा काही शांत बसणार नाही जोपर्यंत चहा भेटणार नाही तोपर्यंत त्याची बुचबुच काही थांबणार नाही.हे ओळखून तीन सईला हळूच सांगितलं. सई घराकडे वळली.सती तिथंच केशर मामिशी बोलू लागली. पिकूही आपल्या मित्रांसोबत खेळायला गेला... .सती आता रुळली होती. संजूला भरभरून साथ देत होती.या व्यवसायासाठी स्वतःला वाहून घेत होती.त्यामुळे संजूही स्थीर झाला होता.लग्न होऊन आली त्यावेळी तिचे खायचे वांदे झाले.पण परिस्थितीवर मात करत ते आता आनंदान जगत होते. एका हातात विळा व दुसऱ्या हातात पाण्याची एक बाटली घेऊन संजू बकऱ्यामागे चालत होता. संजूला आपल्यामागे चालत येत पाहून तसे बोकडे ,काही अंतर पळत पळत पुढे जात अन् थोडस थांबून ....त्याच्याकडे पाहून... पायान माती उकरत... सप्पकन हातभर जमिनीपासून उंच उडी घेत... धडधड...घोड्याच्या गतीनं त्याच्याकडे पळत येत.एकाला पाहून दुसरा ..दुसऱ्याला पाहून तिसरा...असे आट चे आट बकरे धिंगा,मस्ती करीत , म्हसानखाईच्या आजूबाजूला असलेल्या उकिरड्यावर धुमाकूळ घालीत घालीत हिरकाड्याकडे चालत जात होते. संजून इकडून तिकडून घटकाभर बकऱ्या वळून आणल्या...उन्हाचे सावलीला बकरे बांधले.दुपारची न्याहारी करून,नवराबायको घटकाभर गप्पा मारत बसले.उन्ह उतरलं.तसा तो उठला व आपल्या दुकानाची तयारी करू लागला.सतीही त्याला मदत करू लागली.मायबाप दोघे ही काम करताहेत म्हणून त्यांची दोघे पोरं ही त्याच्याभवती घुटमळू लागली.त्यांच्याकडून होणारी छोटी मोटी कामे, आनंदान, उड्या मारत करू लागली. वडाच्या झाडाखाली सावलीच्या आधारान, बसलेल्या माणसांना पाहून एकाकी हिरो स्प्लेंडर मोटारसायकल थांबली.गाडी स्टँडवर लावून ते दोघे हळूच उतरले.बाजूलाच एक छोटीशी चहा पाण्याची हॉटेल .तिथं ही काही माणस जरा अंतरा अंतरावर बसलेले. त्या साऱ्यांचे लक्ष गाडी आणि गाडीवरून उतरलेल्या माणसांकडे गेले. कोण असतील ? काय असतील ? असे अनेक प्रश्न त्यांच्या डोक्यात वळवळून गेले.त्यांचे पांढरे शुभ्र कपडे आणि साहेबी थाट पाहून सारे सावरून बसले. पित्या त्यांच्याकडे पाहत हळूच आपल्या

सोबत्यांना म्हणाला. पोलिस गीलिस तो छेच्छा... काई मालम भोसरा... ढाऊ तो आयद ... पयून जाऊं ...आसिबी काळी माळी नि त्येंच्या जो ... पमाही हळूच पुटपुटला . राम ड राम हो ... भाऊ .. राजेंद्र पाटलानी आपले दोघी हात जोडले आणि सर्वांना अभिवादन केले राम राम .. गोप्याही उत्तरला या गावात पांढरी तांडा कोनचा हाये...... हा हानू जाव... आसं जाऊन आस जा... पित्यानंहाताच्या खुणा करून दाखवत म्हटल. केर घर जायेर छं छं तमेन (कोन्हाच्या घरी जान हाये.... तुमाले )... धनशान विचारलंनाईक सरच्या... राजेंद्र पाटीलानी सांगितल कोंचा तांडा सांग्ला तेंन... गोप्यानं विचारलं पांढरी तांडा.... राजेंद्र पाटलांनी माहिती दिली. कुण छरे नाईक सर ...(कोण हाये रे नाईक सर..) धनशा आश्चर्यान म्हणाला तसा पित्यान ही होकारा भरला काय मालूम भो... सारे एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागले.एकमेकांना विचारू लागले. त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव पाहून आनंदा पाटील हीआंचबित झाले. कायबी नवाई झाली साली हेत्त...तुमच्या तांड्यातल्या मानसाले तुमी वयकू नि राहयले... वसो कोनी ..(तसनि ).. गोप्या नाराजीच्या सुरात बोलला. कुण छरे ... काय झालं .. कोण हाये ...? चहाच्या टपरी जवळ बसलेला , तांड्यातला जाणकार असलेला आजू त्यांच्याजवळ आला. तसं राजेंद्र पाटीलांनी त्याला विचारल भाऊ हो नाईक सरचं घर कोंच्ह हाये .. ... आठी त्त नाईक सर कोन्ही नि ... नाईक सर तो कोई छेच्छा भा हाम भी तो उच केरे छा ... का वो भो इठी नाईक सर कोन्ही नि ... आस्सं कसं हुईंन.. राजेंद पाटील जरा चढ्या आवाजात च बोलले. त्यांच्याच भाषेत उत्तर देत आजू ही जरा नेटानच बोलला. आ हया बाप्पा हे त्तं काय बी झाली मंग... हामच्याच तांड्यातल्या मानसाले हामू नि वयकनार त कोन वयकीन मंग ..हे त्त काय बी नवाई झाली मंग. ... आखो माखो मले चांद दाखो... आशी वात हेगी इतो (आशी गोट झाली हेत्त ).. गोप्याच्या वक्तव्यावर सगळे मोठमोठ्यान दात काढून हसू लागले.विमल,गुटका,मावा तीनशे वीस बार,आणि तंबाखू खाऊन खाऊन त्यांचे पिवळेसट्ट पडलेले दात पाहून आनंद पाटीलांच मन किळसावून गेलं.त्यांचं हसण त्यांच्या जिव्हारी लागल.आपण फजित झालो या चार चौघात. अशी सल त्यांना आतल्या आत बोचू लागली.नाराज होऊन ते आपल्या मोटार सायकलच्या सिटकडे पाहू लागले.तोच वडाच्या झाडावर बसलेल्या एका कावळ्याने बरोबर त्यांच सीटवर छी केली. सरांच्या अंगात किळसेचा काटा भरून आला. या पांढरी तांड्यात कोनी सर राहत नि . यक हाये भो..ते मुंबईला राहयता..... दुसरा त्त... कोनी नि मंग... कोंच्यां शाईत हाये ते... आजून विचारलं मोयखेळयाच्या.... शाईत लागेल हायेनं.. हामु सोबतस काम करतोन ..हे सर. देवारीच्या शाईत हेडसर हाये..तेंच्यास शाईत लागेल हाये.. पांढरी तांडयाचे नाईक सर..... राजेंद्र पाटील जीव तोडू तोडू सांगू लागले.परंतु गोष्ट त्यांच्या ध्यानात उतरत येत नव्हती. तेवढ्यात आनंदा पाटीलांच्या खिशात असलेल्या फोनची रिंग वाजू लागली. थोड्या दूरवर जाऊन ते बोलू लागले. फोन आशिन तुमच्याजो.. लावून महयाजो दया ... राजेंद्र पाटीलने फोन लावला. रिंग वाजू लागली . तसा आजून फोन हिसकून आपल्या जवळ घेतला हॅ ो हाल्लू .... हाल्लू .. तू कुण बोलरो छी रं . ?.शान्यान विचारताच तिकडून फोन कट झाला. मायबाप आपल्या कामात व्यस्त,अशी संधी पुन्हा कधी मिळणार नाही. घरात चार्जवर, लावलेल्या फोनवर ,पिकू मस्तपैकी गेम खेळत होता .पुन्हा फोन वाजू लागला.तसा त्यानं परत कट केला. परत एकदा राजेंद्र पाटीलानी फोन लावला.फोन कट करायच्या नादात ...फोन मधून आवाज येवू लागला.... हाल्लू हाल्लु....तू कुण बोल रो छीरे.... म पिकु बोल रो छू नि रे..... तेले म्हणा इस्ठयान वर ये ... हे कोनी तरी पावने येल हाये ...म्हना तुमच्या घरी .. हाल्लू हाल्लू पिकू . इस्ठयानेप आ .. तमार घर पामणे आय छ... तू कुण बोल रो छी . ? म आज्जू बोलरो छू.... आंव छू....आव छू... आता हा पिकू कोणाचा लेक हाये साला.... धनशान डोक्याला हात लावला. त्याच्या बापाला जर आपण ओळखू शकलो नाही तर या पोराला काय ओळखणार...? तेचा पोर्गा यून राहला हो....इठी हिस्ठ्यानवर ... आता हुईन दुदच दुद...

पान्याच पानी....        फोन मधला गेम कट करून तो उठला.घराचा दरवाजा आडवा केला. मायला सांगावं तर माय ही दुकानात ..तो तसाच धावला. आता हुईन दुदच दुद... पान्याच पानी....    तुमिच करत बसा त्ये... पान्या च पानी...न दुदाच दूध पेत रा..... आनंदा पाटीलांच्या अशा तिरसट बोलण्याने सगळ्यांचे चेहरे उतरून गेले... कारे भो हाच हाये का तो पिकू .?....अन् तेचा बाप... नाईक सर.... सगळयानीच डोक्याला हात लावला .पिकुला पाहून सगळ्यांच्या चेहऱ्यावरचे रंग बदलून गेले.त्यांच्या तोंडातील वाचाच गेली.ते सगळे त्याच्याकडे डोळे फाडून फाडून पाहू लागले.काखेत कोळसा अन् गावाला वळसा.अस प्रत्येकाला वाटू लागलं.    तो गाडीजवळ आला. राजेंद्र पाटील आणि आनंदा पाटीलांनी त्याला चेहऱ्याच्या ठेवणीवरून बरोबर ओळखलं. त्याला पाहून त्यांना हायस वाटलं.... तुहया  बाप हायेन घरी... राजेंद्र पाटलांनी सरळ त्यालाच विचारलं. हाव हाये....चाल बसं  मंग... रस्ता दाखवत दाखवत पिकू त्यांना घरी घेऊन आला.राजेंद्र पाटीलांनी गाडी लावली . आनंदा पाटील गाडी वरून खाली उतरले.... तस त्यांनी पिकूला विचारलं. कुटी हाये तुह्या बाप.... आन बर बोलून... महया पप्पा काम करून राहयलानं.... मी महया मम्मी ले आनतो ते तुमच्यासाटी च्या करीनं... पिकूची चपळाई आणि हुशारी पाहून आनंदा पाटील खुष झाले .पिकून त्यांना बसायला एक बाज टाकली.हात पाय धुण्यासाठी पाणी दिलं.पळत जाऊन त्यानं आपल्या मायला ही बोलवून आणल. आणि बापाच्या कानात ही हळूच सांगल. वट्यावर बसलेल्या पाहुण्यांना पाहून सती गडबड ली. साहेब आहे की कोण आहे? यांना जर अशा अवतारात पाहिलं तर काय होईल.?..यांचं काही बरंवाईट झालं तर... आपल काय होईल ? शेवटची आशा ही मावळते की काय? आज  पहाटेपासूनच महया एक डोया फडकुन राहिला ते काही खोटं नही आजचा दिवसच मेला कायकुट्या आहे. पाहटच निस्तरू निस्तरू जीव सगळा हेक्स होऊन गेला....तरीबी पिच्छा सुटूनि राहयला माय आफतवर आफत, तोमतवर तोमत येऊनच राहिली सऱ्या पाटपासून.... त्यांच्याजवळ येऊन ती हळूच बोलली. मोयखेयच्या शायीतले सर हाये का तुमी .. हाव ... सर कुटी जायेल हाये... ते तिटी... वाडग्यात.... पुढं काय बोलावं सतीला सूचलच नाही.ती लटलट कापू लागली. आता हे सर काय म्हणतील ? विचारांच्या गडबडीत तीन त्यांना पाणी दिलं. वरच्याकुन चहा ही करून आणला. दोघे ही बाजीवरून उठले. घराच्या बाजूला असलेल्या बैलांच्या वाडग्यात माणसांची तुफान गर्दी उसळली होती. जो तो म्हणत होता.. बोलत होता  मले दे रे यक् किलो... मन दरे छोरा आधो किलो... कतरी वणार हुबी छू म.. आनसी काकी  माणसाच्या रांगेतून वाट काढत कशी बशी पुढे येत बोलली. व.. संजू मले कितला टाईम झाला मायच्याना... तू त्ह बिल्कूल ध्यान देत नि.. बाप्पा मांगून येल लोकालेच द्यून राहला .कहाची गम्मत पाहू राहयलो मी... थाम ये काकी घळीभर जायदं मन... शिरा ढोण्यान असं म्हटल्यावर आनसी काकी ल भिया.. गर्दी एवढी पडली की कोण काय म्हणतो आहे . हे अजिबात संजूला समजत नव्हत . तो एका हातानं पैसे घेत होता दुसऱ्या हातान पटापट मटन मोजून देत होता. बोलणारी तोंड सतरा आणि काम करणारा तो एकटा होता.त्यामुळे त्याची एकट्याची फजिती होत होती.शिवाय उतरतीच्या कडक झळानी तो घामाघूम झाला होता... गर्दीतून वाट काढत आनंदा पाटील आणि राजेंद्र पाटील पुढे आले.... एका हातात छूरा आणि समोर उलटा टांगलेल्या बोकड्याच्या रक्त आणि मटणाच्या तुकड्यान आंग तोंड भरलेल्या संजुकडे पाहून त्यांची बोलती बंद झाली.

संपर्क – ७५५९३२२८७६

स्तुत्य उपक्रम

# श्यामची आई - कथा अभिवाचन एक प्रज्वलित संस्कारयज्ञ



सुनिल मोरे
धुळे

बालकांची शाळा पूर्वतयारी आणि नितीमूल्यांचे संवर्धन या हेतूने धुळे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या श्यामची आई पुस्तकातील कथा अभिवाचन उपक्रमाची यशोगाथा.

गेले वर्ष-दीड वर्षे कोविड प्रकोपामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांसह सारी समाजव्यवस्था व्यथित झाली. आकस्मिक आलेल्या कोरोनारूपी संकटात सारे हतबल असतांना आपली भावी पिढी सुरक्षित राहावी यासाठी शासकीय आदेशानुसार शाळा बंद झाल्या आणि साऱ्या शाळांमधील चिमण्या पाखरांचा किलबिलाट थांबला.बघता बघता दीड दोन वर्षांचा प्रदीर्घ कालावधी लोटतांना कोरोना काळात बालकांच्या शिक्षणाचा प्रवाह अखंड सुरू रहावा म्हणून ऑनलाईन शिक्षणाचा एक नवा पर्याय समोर आला. मुलांपासून मोबाईल लांब ठेवा असे म्हणणारे आपण मग शिक्षकच मुलांच्या हाती मोबाईल द्या म्हणून सांगू लागलो. शहरी भागात सधन पालकांनी मुलांच्या हाती मोबाईल दिल्यावर तहानभूक विसरून तासनतास विद्यार्थी त्यातील थोडा अभ्यास आणि खेळात जास्त रमू लागले मात्र  खेड्यापाड्यात यापेक्षा विपरीत परिस्थिती होती. शाळा बंद पण शिक्षण सुरू या अंतर्गत आभासी पध्दतीने विद्यार्थ्यांना शिक्षण देतांना वाडीवस्तीवर हा प्रयोग तितकासा यशस्वी झाला नाही आणि गोरगरिबांच्या,वंचितांच्या मुलांच्या हाती असणारी शिक्षणाची पाटी घरी बसून फुटली. प्राथमिक शिक्षणाच्या ओघात ऑनलाईन शिक्षणात अनेक मर्यादा येतांना माझ्यासारख्या अनेक शिक्षकांनी त्यावर आपापल्या परीने मार्ग काढायला सुरुवात केली मात्र यामुळे पदरात फारसे काही पडले नाही.

एका बाजूला सारे विद्यार्थी, शिक्षक नव्हे सारी समाजव्यवस्था कोरोनाच्या लाटांचा सामना करतांना जो घरी राहील तोच सुरक्षित राहील म्हणून सर्वांनाच घरात बंदिस्त व्हावे लागले. बाहेर कोरोनाचा हाहाकार सुरू असताना दिवसागणिक येणाऱ्या अप्रिय घटनांनी सर्वांनाच आपल्या जीविताविषयी व्यापक प्रमाणात मानसिक चिंता आणि अस्तित्वाची  अनिश्चितता निर्माण केली होती. तर दुसऱ्या बाजूला या संकटात ज्यांना आपले प्राण गमवावे लागले त्यांची होणारी अवहेलना साऱ्यांचे हृदय पिळवटून टाकत होती.माणसापासून माणूस दूर राहतांना कोरोनारूपी राक्षसाने सारी माणुसकी, संवेदना, प्रेम, जिव्हाळा, सहकार्यवृत्ती, सहानुभूती, सामाजिक दातृत्व अशा जीवनमूल्यांवर देखील घाला घातला होता.

अश्या परिस्थितीत शाळा बंद असल्यामुळे आपल्या विद्यार्थ्यांशी ताटातूट झाल्याचे दुःख मनात होते.एरवी सुट्टी हा शब्द ऐकण्यासाठी उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांना हीच हवीहवीशी वाटणारी सुट्टी कधी नकोशीही वाटेल असे कधी वाटलेच नव्हते.त्यातच प्राथमिक शाळा सुरू

होण्याबाबत अनेक वेळा शासननिर्णय होतांना प्रत्यक्षात विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ नको म्हणून आजही शाळा बंद आहेत.या सर्व वर्षादीडवर्षाच्या कालावधीत विद्यार्थी केवळ शिक्षणापासूनच नाही तर शाळा शाळांमधून कळतनकळतपणे दिल्या जाणाऱ्या संस्कारापासून देखील वंचित झाले असतांना घरी राहून कंटाळलेल्या,निरस झालेल्या विद्यार्थ्यांसाठी प्राप्त प्रतिकूल परिस्थितीत आपत्तीचा सामना करतांना मला एकवेळ शिक्षणाचा प्रवाह माझ्या ४२ बालकांपर्यंत पोहोचविता आला नाही, मात्र कोरोना काळामुळे,शाळा बंद असल्यामुळे त्यांच्यात लोप पावलेले संस्कार आणि माणूस म्हणून जगण्यासाठीचे संस्कार आणि जीवनमूल्ये कशी रुजविता येतील हा विचार मला स्वस्थ बसू देईना. माझ्या शाळेच्या संकुचित विचाराबरोबर माझ्यारखेच माझ्या अनेक व्यवसाय बंधूंना देखील अशीच आपल्या विद्यार्थ्यांबद्दल काळजी वाटत असेल ! यासाठी सर्वसमावेशक असे काही मला करता आले तर ? या विचारात असतांना माझ्या ४२ विद्यार्थ्यांच्या पटावरून एकदम आठवले की, मातृप्रेमाच्या महामंगल स्तोत्ररुपी श्यामची आई या पुस्तकात नेमक्या ४२ कथा आहेत ज्या संस्कारांनी ओतप्रोत भरलेल्या आहेत या कथा नक्की काही प्रभाव टाकू शकतील.तसे आजवर अनेकांनी श्यामची आई या पुस्तकाचे त्यातील कथांचे जरी पारायणे केली असली तरी त्यातल्या कथा सदासर्वदा खूप काही शिकवून जातात.मग यावर मी पुन्हा मनात विचारमंथन सुरू केले.इच्छा तेथे मार्ग नुसार मनात आलेल्या विचारप्रवाहाला प्रमाण मानून जिल्ह्यातील चारही तालुक्यातील सुस्पष्ट, प्रभावी वाचन करणाऱ्या असे २१ शिक्षक आणि २१ शिक्षिका यांची निवड केली.त्यांना कथेचे वाटप केले आणि त्यांना उचित स्वरात,योग्य आरोह –अवरोह यासह पुस्तकातील ४२ कथांचे अभिवाचन करून त्या मागविल्या.वाचकांनी पाठविलेल्या एकेक कथा मी सुरुवातीपासून शेवटपर्यंत अनेकदा ऐकून त्यातील बारकावे,त्रुटी शोधल्या.खरं म्हणजे अनेक शिक्षकमित्रांना अभिवाचन याबद्दल फार काही ठाऊक नव्हते म्हणून त्यांच्या झालेल्या चुका त्यांच्या निदर्शनास आणून देऊन त्यांची दुरुस्ती करवून घेतली आणि वाचन केलेल्या कथांचे सर्वोत्तम ऑडिओ क्लिप पुन्हा मागवले.ऑडिओ क्लिप मध्ये सुरुवातीला थीम संगीत आणि त्यांच्या वाचक स्वरात बासरीचे मृदुल असे पार्श्वसंगीत मंद स्वरूपात मिसळले आणि गुगल ड्राईव्ह मध्ये ऑडिओ क्लिप ची लिंक तयार केली त्याचबरोबर या कथांवर आवश्यक त्या तंत्राचा वापर केला.कथा आणि अभिवाचक शिक्षक यांच्या नावाचा आणि प्रायोजक म्हणून सर फाऊंडेशन धुळे या नावांचा उल्लेख असलेला संक्षिप्त मेसेज तयार केला आणि या कथा प्रसारित करावे असे मनाशी ठरविले. त्याचवेळी या शैक्षणिक उपक्रमासाठी आपल्या प्राथमिक शिक्षण विभागाची साथ मिळाली तर बघूया म्हणून प्राथमिक शिक्षणाधिकारी मनीष पवार साहेबांची भेट घेतली.त्यांना उपक्रम का,कशासाठी, त्याचे नियोजन व उपक्रमाच्या माध्यमातून साध्य होणारे फलित याबाबत सविस्तर सांगितल्यावर शिक्षणाधिकारी महोदयांनी यासाठी तात्काळ अनुमती दर्शवली आणि १ जुलै पासून जिल्ह्यात 'बालकांची शाळपूर्वतयारी आणि नितीमूल्यांचे संवर्धन' या हेतूने श्यामची आई – कथा अभिवाचन उपक्रमास सुरुवात केली. यात सहभागी सर्व म्हणजे ४२ अभिवाचकांचा समूह तयार करून दरदिवशी एक कथा याप्रमाणे सकाळी ठीक ८ वाजता वाचकांच्या समूहात ऑडिओ क्लिप रूपाने आणि लिंकसोबत शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्या आवाहन केलेल्या लिखित मेसेज या पद्धतीने पोस्ट केल्यावर तेथून ती वाचकांच्या मदतीने चारही तालुक्यातील सर्व केंद्र, बिट, असे करतांना जिल्ह्यातील शिक्षकांच्या व्हाट्सअप्प समूहात आणि तेथून प्रत्येक शाळेच्या बालकांपर्यंत कथांचा प्रवास सुरु झाला.सर फाऊंडेशन सोबत आपल्या जिल्ह्याच्या प्राथमिक शिक्षण विभागाचा उपक्रम म्हणून हा उपक्रम जिल्हाभर पोहोचू लागला. एकेक कथेच्या अभिवाचनासाठी वाचकांनी केलेला सराव, त्याचबरोबर सुस्पष्ट, प्रभावी स्वरातील आवश्यक तिथे आरोह–अवरोह आणि कारुण्यरसाची त्याला लावलेल्या झालरीने कथा केवळ बालकांच्या नव्हे तर पालकांच्याही हृदयाचा ठाव

घेऊ लागल्या.खेडोपाडी ग्रामदेवतेच्या मंदिराच्या आरतीनंतर तेथून लाऊडस्पीकरवरून कथा मंदिरात उपस्थित आबालवृद्धांसह घराघरांत प्रवेश करतांना साऱ्यांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या करू लागल्या.केवळ दहा ते पंधरा मिनिटांची ही ऑडिओ क्लिप अनेकांच्या मानसिकतेत खूप काही सकारात्मक बदल करण्यात यशस्वी होण्याचा संकेत देऊ लागली. श्यामची आई पुस्तकातील शिक्षकांनी अभिवाचन केलेल्या कथा बालकांसहित लहानथोरांमध्ये सहानुभूती,श्रमाचे महत्व स्त्री-पुरुष समानता, राष्ट्रभक्ती, सर्वधर्मसमभाव, सामाजिक जाणिवा, आपुलकी, सहकार्यवृत्ती, माणुसकी, जिव्हाळा अश्या जीवनमूल्यांच्या रूपाने जीवनकौशल्य आणि संस्कारांचे बाळकडू देऊ लागल्या. जिल्ह्यातील बालकांच्या नितीमूल्यांच्या संवर्धन हेतूने आयोजित केलेल्या कथा इतर जिल्ह्यातील अधिकारी,शिक्षक यांच्यादेखील मनाला भावल्या आणि नित्यनेमाने कथा आमच्या जिल्ह्यात पाठवा म्हणून मागणी होऊ लागली. अगदी उचित वेळेला धुळे जिल्हा परिषदेने एका स्तुत्य उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल बालमानसशास्त्रज्ञ तथा शिक्षणतज्ज्ञ श्रुती पानसे,साहित्यिक उत्तम कोळगावकर, माधव कदम, रामदास वाघ आणि अनेक मान्यवरांनी उपक्रमासंदर्भात आपल्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया नोंदविल्या. बघता बघता धुळे जिल्ह्यात राबविलेल्या अभिवाचन उपक्रमातील कथा राज्यभरात पोहचू लागल्या त्याचबरोबर इतर जिल्ह्यात देखील याचे अनुकरण झाले हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य.

या उपक्रमाचे संयोजन करतांना मी योजिलेला हा उपक्रम जिल्ह्याची बंधने झुगारून राज्यभर प्रसारित होण्या इतकी उंची गाठेल याची पुसटशी देखील कल्पना मला नव्हती मात्र अचूक, काटेकोरपणे केलेले नियोजन आणि दर्जेदार वाचनस्वरामुळे कथांचा सर्वत्र प्रसार झाला.शाळा बंद असतांना बालकांच्या ठायी संस्काराची पेरणी करण्यात यशस्वी झालेल्या या उपक्रमाची दखल जिल्हा परिषद धुळे चे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षण सभापती, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी घेतली. उपक्रमात सहभागी झालेल्या शिक्षकांना दखल घेणाऱ्या मान्यवरांच्या समारोप सोहळ्यात आम्ही आमंत्रित करून त्यांच्या हस्ते सर फाऊंडेशन धुळे च्या माध्यमातून दिमाखदार समारोप सोहळ्याचे १७ ऑगस्ट रोजी आयोजन केले. आमच्या सर फाऊंडेशन टीम धुळे मधील आम्ही केवळ १२ समन्वयकांनी झोकून दिलेल्या या उपक्रमात शेवटची कथा १३ ऑगस्ट रोजी संपन्न होतांना याच्या समारोपाबाबत विचारविनिमय केला आणि समारोपाच्या कार्यक्रमात सर्व अभिवाचक शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सन्मानित केले. याचबरोबरतर उपक्रमाचे उत्कृष्टपणे संयोजन केल्याबद्दल मान्यवरांनी सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन जिल्हा परिषदेने माझाही सन्मान केला. जिल्ह्यातील शिक्षकांनी चाकोरीबाहेर जाऊन केलेला या संस्कारक्षम उपक्रमासरखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या भावी भविष्यासाठी नक्कीच परिणामकारक ठरतील आणि त्यासोबत उपक्रम सुंदर रीतीने राबविल्याबद्दल गौरवोद्गार काढले.

या उपक्रमाच्या निमित्ताने पूज्य साने गुरुजींच्या कारुण्यरसाने ओतप्रोत भरलेल्या श्यामची आई या पुस्तकातील कथांचे अभिवाचन हा केवळ एक उपक्रम न राहता तो एक संस्कारयज्ञ ठरला.बालकांसहित पालक आणि समाजामध्ये हरवत चाललेल्या संस्कारमूल्यांची रुजवणूक करण्यात यशस्वी उपक्रम ठरला हे या उपक्रमाचे फलित म्हणावे लागेल.

**(सुनिल मोरे हे जि.प. प्राथमिक शाळा चुडाणे ता.शिंदखेडा जि.धुळे येथे कार्यरत.)**

संपर्क -९६०४६४६१००

संस्कारक्षम उपक्रम

# श्यामची आई - कथा अभिवाचन



सारिका रंधे
शिरपूर-धुळे

उपभोग घेऊ नये एकट्याने,वाढतो आनंद पुन्हा पुन्हा वाटल्याने!

शिक्षकाचा पिंड केवळ विद्यार्थी घडवणे असतो .मग कोरोनासारखी महामारी असो कि नैसर्गिक आपत्ती असो.ज्ञानाचा ठेवा विद्यार्थ्यांप्रत पोचवून शिक्षणप्रवाहात टिकून रहावं ,अध्ययन व अध्यापन सुरळीत व्हावे, त्यांच्या सुप्तकलागुणांना वाव देण्यासाठी विविध प्रयोगक्षम तंत्र जसे अलिकडच्या काळात तंत्रस्नेही कौशल्याचा वापर करतो.

अशाच एका दखल घेतल्या गेलेल्या उपक्रमाबद्दल सांगावेसे वाटते. ज्या उपक्रमांत हिरीरिने सहभाग घ्यावा असे मलादेखील वाटले व या सुवर्णक्षणाचे साक्षीदार होण्याविषयी आत्मीयता वाटावी असा श्यामची आई या संस्कारक्षम पुस्तकाचा अभिवाचन ऊपक्रम होय. जि.प.शाळेचे प्रयोगशिल शिक्षक सुनिल मोरे यांच्या कल्पकतेतून साकारलेला हा उपक्रम! जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग धुळे व सर फांऊडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा ऊपक्रम राबविण्यात आला. विविध शाळांतील शिक्षक सहभागी होऊन पू.साने गुरूजी लिखित श्यामची आई या पुस्तकातील प्रस्तावनेपासून ते सबंध कथांचे प्रभावी वाचन ऑडिओ स्वरूपात करून ते दररोज प्रसारित करण्यात आले. अभिवाचनात वाचकाची कौशल्य तपासुनच हा ऑडिओ सर्वांप्रत पोचतो. अभिवाचन करताना कसोटी व बुद्धीचा कस लागतोच. मी जेव्हा पहिला ऑडीयो ऐकला तेव्हा मला वाटले आपणही सहभागी व्हावे. पण वाटले तितके सोपे नव्हते.कुठलेही काम बेस्ट देणे त्यात परीक्षा असते.तसे आयोजकांना पाचारण केले असतां त्यांनी मला लगेच होकार न देतां अभिवाचन जबाबदारीचे महत्व पटवून दिले.व मी अभिवाचन केले.त्यात रसिक श्रोत्यांना साहित्याचा आनंद मिळावा व मराठी समृद्ध होत जावी हाही मोठा ऊद्देश आहे. वाचन संस्कृती वृद्धींगत होऊन अबाल वृद्ध श्रोतेवर्गाला सोशल मिडीयाच्या माध्यमातून लाभ व्हावा याचसाठी केला होता अट्टाहास असे म्हणावे लागेल. प्रयत्नांती परमेश्वर नसून प्रयत्न हाच परमेश्वर मानून साने गुरूजींची ही धडपडणारी मूले प्रत्यक्षदर्शी वसा जपतात. शाळा बंद शिक्षण सुरू या विजयी मुद्रेने, सकारात्मक मंत्राने प्रारंभ करत कोरोनाच्या प्रतिकूल परिस्थितीत शिक्षक असे उपक्रम राबवून शैक्षणिक क्षेत्रात आनंदक्षण निर्माण करतात व आपले स्थान निर्माण करतात.

पु.साने गुरूजींच्या शब्दात सांगायचे तर.. जीवन म्हणजे जे जे आपण आहोत व जे जे आपणाला भेटते त्या सर्वांचे प्रकाशात आणि ज्योतीत परिवर्तन करणे; स्वत:ला व स्वत:भोवतीच्या वस्तूपात्राला तेजोमय करणे,ज्योतीर्मय करणे.

**(सारिका निशांत रंधे या सौ.सावित्रीताई व्यं.रंधे कन्या विद्यालय शिरपूर जि. धुळे येथे पर्यवेक्षिका म्हणून कार्यरत आहेत.)**

संपर्क - ९८५०२४७१२२

पुस्तक परिचय

# सिमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल




**गुलाब बिसेन**

कोल्हापूर



सिमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल ही राज्य शासनाचा पुरस्कार प्राप्त साहित्यिक डॉ. श्रीकांत पाटील यांची बालकादंबरी. कोरोना महामारीच्या प्रकोपामुळे लॉकडाऊन पडून माणसे घरात बंदिस्त झालीत. बाजार, व्यापार, वाहतूक सगळं बंद पडले. रस्ते सुनसान झाले. मानवी वस्त्या निर्जन झाल्यासारखी परिस्थीती निर्माण झाली. अशा अभूतपूर्व परिस्थितीत वन्य प्राणी सहलीच्या माध्यमातून मानवी वस्तीचा फेरफटका मारून त्यांच्या नजरेतून सिमेंटच्या जंगलाचे अर्थातच मानवी वस्तीचे दर्शन वाचकाला ही कादंबरी  घडवते.

वन्य प्राण्यांनी समृद्ध अशा वनात प्राण्यांच्या पिलांची शाळा आहे. या शाळेमध्ये नलिनी चित्ते, सहदेव वानरे, विश्वजित वाघ, शोभा काळविटे,गाढव शिपाई असा स्टाफ असून सुजय हत्तीसर शाळेचे मुख्याध्यापक आहेत. या कादंबरीचे कथानक मानवी संवादातून फुलले असल्याने हे सर्व प्राणी एकमेकांशी माणसाप्रमाणे आपापसात बोलतात. या कादंबरीची सुरूवातच शाळेतून होते. वानर पोरे शाळेला दांडी मारून आपल्या पालकां सोबत मानवी वस्तीत जावून येतात. मुलांची हालहवाल जाणून घेण्यासाठी वानरे सर वानरांच्या वस्तीवर जातात. तेव्हा त्यांना मानवी वस्तीतील परीस्थिती वानरांकडून समजते.

निर्मनुष्य रस्ते, मोकळी शिवारे, घरात बंदिस्त जनता,

मास्क वापरा - संसर्ग टाळा,घरात राहा - कोरोनाला हटवा, घरीच राहा - सुरक्षित राहा, नियम पाळा - कोरोना टाळा.

यासारख्या सूचना देत गावातून फिरणाऱ्या गाड्या, शाळेत क्वारंटाईन असलेली माणसे अशी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झालेले सिमेंटचे जंगल आणि त्यात सहलीच्या निमित्ताने पहिल्यांदाच फेरफटका मारणारी



जंगली जनावरे यांचा हा रंजक सहलीचा प्रवास बाल वाचकाला खिळवून ठेवणारा आहे. यात लेखकाने रंजकतेतून प्राण्यांचे संवाद आणि माणसावर ओढवलेली परीस्थिती बालवाचकालाही सहज समजेल अशी कादंबरीची मांडणी केली आहे.

मानवी हव्यासामुळे प्राण्यांच्या अधिवासावर झालेले अतिक्रमण असेल किंवा जंगलातील अन्नाची कमतरता भागवण्यासाठी असेल, प्राणी आणि मानव यांच्यांत नेहमी द्वंद्वाची परीस्थिती निर्माण झालेली दिसून येते. परंतु या कादंबरीत मात्र कोरोनामुळे लॉकडाऊन पडलेल्या गावात प्राण्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक सुजय हत्तीसर सिमेंटचे जंगल बघायला सहल काढतात. एरवी माणसांना बघून घाबरून पळणारे प्राणी घरात बंदिवान झालेल्या माणसाची वस्ती बघण्यासाठी लॉकडाऊनचा काळ सुवर्ण संधी समजून हौसेने सहलीला जातात. वानरे सर संपूर्ण सहलीचे नियोजन करतात. थांबायचे कुठे, न्याहारी कुठे करायची, विश्रांती कुठे किती वेळ घ्यायची याची आखणी ते करतात.

सहल गावाच्या दिशेने निघाल्यावर रस्त्यात प्राण्यांची पिल्ले आंबा – फणसाची, चिंच जांभळाची न्याहारी करतात. मांसाहारी वाघाची पिल्ले उसाच्या फडाजवळची कुत्र्याच्या  पिल्लांची शिकार करून न्याहारी करतात. परंतु तिथे त्यांना अडवायला कुणीही माणसं नसतात. विहिरीचं गार पाणी पिऊन प्राणी गावाकडे निघतात. गावातील चकचकीत रस्ते बघून सर्व प्राणी चकित होतात. गावातील मुख्य रस्त्याने सहल पुढे पुढे जात राहते. तेव्हा घरातील खिडक्यांतून डोकावून बघणारी माणसे प्राण्यांना दिसतात. यावेळी सर्व प्राणी मोबाईलने फोटो, सेल्फी काढण्याचा आनंद लुटतात. सहलीत प्राणी माणसांनी बांधलेले मंदिर, शाळा, कौलारू घरं, झोपड्या, बंगले, ग्रामपंचायत, दूध डेअरी, पतसंस्था, वाचनालय बघतात.

कोरोनाने त्रासलेल्या माणसाला दंगा करून अजून त्रास न देण्याचा वानरे सरांचा सल्ला सर्व वन्य प्राण्यांच्या स्वभावगुणाचे दर्शन घडवतो. गावातील वेगवेगळ्या प्रकारची घरे समाजातील विषमतेकडे बोट दाखवतात. वन्य प्राण्यांच्यात नसलेली गरीब श्रीमंतांची दरी वन्य प्राणी सिमेंटच्या जंगलात प्रत्यक्ष बघतात. नेहमी प्राण्यांना घाबरवणारा माणूस कोरोनाने भयभीत झालेला आहे. प्रदूषित नदीतील पाणी न पिण्याचा वानरे सरांचा सल्ला माणसाला आत्मपरीक्षण करायला भाग पाडणारा आहे.

सिमेंटच्या जंगलात दिवसभर फेरफटका मारून प्राण्यांची सहल आपल्या जंगलात परतते. त्यानंतर शाळेत परीपाठात सहलीसंदर्भात प्राणी आपले अनुभवकथन करतात. यावेळी जंगलांवर अतिक्रमण केल्याने माणसावर नाराज असलेले प्राणी आपला रागही व्यक्त करतात. शेवटी सहलीवर आधारीत अनुभवकथन, निबंध लेखन, चित्र रेखाटन स्पर्धेच्या विजेत्यांना बक्षिस वितरणानंतर कादंबरीचा शेवट होतो.

या कादंबरीतून कोरोना रोगाच्या भितीने भयभीत झालेली माणसे, क्वारंटाईन असलेली माणसे यातून कोरोना संकटाची भिषणता तसेच माणसाने जंगलावर केलेले अतिक्रमण, प्राण्यांची केलेली बेसुमार शिकार याकडेही ही कादंबरी वाचकाचे लक्ष वेधते. सोबतच कोरोना या विषाणूमुळे माणूस आज जरी संकटात असला तरी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर तो संशोधन करून, लस निर्मिती करून, औषध निर्मिती करून या संकटावर एक दिवस नक्की मात करेल हा आशावादही लेखकाने कल्पकतेने व्यक्त केला आहे. मुलांच्या भावविश्वात वावरणारे प्राणी, त्यांचे संवाद, स्वभाव गुण यांनी सजलेली ही बालकादंबरी बाल वाचकांना नक्की आवडेल यात शंका नाही.

संपर्क – ९४०४२३५१९१

पुस्तकाचे नाव – सिमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल
(बालकादंबरी)
लेखक – डॉ. श्रीकांत पाटील (९१७२७ १६३४१)
प्रकाशन – ह्रदय प्रकाशन, कोल्हापूर
पृष्ठे – ६४    किंमत – २५० रू.

# पायाभूत भाषिक व गणितीय साक्षरता

## संकल्पना व गरज




दत्तात्रय खंदारे

करकंब-सोलापूर


मराठी विषयाची प्रगती पाहताना असे वाटते की अजूनही बऱ्याच मुलांना चांगले वाचन करता येत नाही. विशेषत:झोपडपटटीतील मुले,मराठी मातृ भाषा नसलेली मुले, कौटुंबिक कारणाने शाळेत अल्प उपस्थिती असणारी मुले यांना मराठी भाषा लवकर ग्रहण होत नाही. मराठी भाषा सतत कानावर पडत असते पण विविध कारणाने मूल ती भाषा स्वीकारत नाही. शिक्षक १००% मुलांना प्रगत करण्यासाठी सतत प्रयत्न करत असतात. अनेक वेगवेगळे उपक्रम राबवत असतात. पण हाती निराशाच पडते. हजारो रुपयांचे शैक्षणिक साहित्य वापरूनसुद्धा यश मिळत नाही.मूल ढकलत ढकलत पुढच्या वर्गात जात असते.एखादी संधी मिळाली तरच ते मूल शिकू शिकते.

मराठी भाषेमध्ये क्रमवार ५२ मूळक्षारे आहेत सर्वसामान्य क्षमता असलेल्या, अंगणवाडीत न गेलेल्या इंग्रजी माध्यमाच्या बालवाडीतून आलेल्या बालकांना एवढी अक्षरे राक्षसासारखी वाटतात. पुन्हा काना, मात्रा, वेलांटी , उकार, अनुस्वार ,अँ ,आँ हे वेगळेच.

आजपर्यंत मराठी भाषेचे वाचन -लेखन पारंपरिक पद्धतीने शिकवले जातेय. बालकाला आनंददायी पदधतीने शिकवण्याऐवजी बाराखडी चौदाखडीची अनावश्यक घोकंपटटी करायला भाग पाडले जाते.

सुमारे २५ वर्षांच्या शैक्षणिक वाटचालीकडे पाहताना, अनुभवातून असे लक्षात आले विद्यार्थांना अंक तर समजतात. मग अंकाप्रमाणे शिकवले तर ! आणि या प्रकारे वरील गटातील १००% मुलांना मराठी भाषा येत आहे.वाचन व त्याबरोबरच लेखन Utkrusht प्रकारे येत आहे.

शिक्षणाचे ध्येय 'बालकाचा सर्वांगिण विकास' असे



आहे.बालकाला जे ज्ञान द्यावयाचे ते केवळ एकांगी असून चालणार नाही. सर्वांगीण विकास होण्यासाठी बालकाला विविध प्रकारचे ज्ञान देणे आवश्यक असते. त्यासाठी शाळेमध्ये विविध प्रकारचे विषय शिकवले जातात. हे विषय शिकवत असताना विविध विषयातील परस्परसंबंध लक्षात आणून देणे गरजेचे असते, अन्यथा शिक्षणासाठी विनाकारण अधिक वेळ खर्च करावा लागेल. जीवनातील प्रत्यक्ष अनुभव व शालेय विषयाचा समन्वय घातला गेला तर त्या विषयाचे मूल्य वाढते विविध विषयांची समन्वय साधल्याने अध्यापनासाठी वेळ कमी लागतो. तसेच विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक बनो.

प्रथम ०, १, २, व ३ हे अंक शिकल्यावर अ, व, ब, क, र, ख, स, ही सात मूळाक्षरे मूल निश्चितच शिकेल .ताबडतोब लिहू लागेल .त्यापासून तयार होणारे सर्व शब्द व वाक्ये वाचू व लिहू लागेल . नंतर य थ श ग म भ न आ ट ठ ड ढ द झ ह इ ई उ ऊ प फ ष ण ए ऐ ओ घ छ त ल च ज ध ळ क्ष ज्ञ औ अं अ: ऋ अँ आँ क्रम वाचन लेखनासाठी योग्य आहे.

गणित व मराठी समन्वयामुळे मराठी शिकू इच्छिणाऱ्या कोणत्याही बालक वा प्रौढ व्यक्तीचे मराठी भाषा शिक्षण कमीत कमी वेळेत होईल.

**(दत्तात्रय बाबूराव खंदारे हे उपशिक्षक जि प प्रा शाळा मुली क्र.२ करकंब ता पंढरपूर जि सोलापूर येथे कार्यरत आहेत.)**

संपर्क - ९५५२७५६७७५

## माझी कविता

**रमेश परशुराम राठोड**
जामनेर-जळगांव

आई मला दे नं...
आई, मला छोटीशी पाटी तू देना
पाटी मी घेईन शाळेत जाईन तिच्यावर लिहिन १२३
आई, मला छोटीशी पेन्सील तू देना
पेन्सिल घेऊन शाळेत जाईन पाटीवर लिहिन १२३
आई, मला छोटीशी पुस्तक तू देना
पुस्तक घेऊन शाळेत जाईन धडा मी वाचिन
भर-भर-भर
आई, मला छोटीशी वही तू देना
वही मी घेऊन धडे मी गिरविन
सर-सर-सर
आई, मला छोटासा पेन तू देना
पेन मी घेऊन शाळेत जाईन साहेब होईन सही मी करीन
भर-भर-भर
आई, मला छोटासा मोबाइल दे ना
मोबाइल घेऊन नेट मी चालविन
सरचिंग मी करीन सर-सर-सर
आई, मला छोटासा tab तू दे ना
tab मी घेऊन तंत्र मी सिकिन U-tube पाहिन
छान-छान-छान
आई, मला छोटीशी मोटार तू देना
मोटार घेऊन गावाला जाईन पों-पों-पों
आई, मला छोटासा विमान तू देना
विमान घेऊन पायलेट होईन आकाशी जाईन
भर-भर-भर

संपर्क -८७६६५२८१५०

## गुरुवंदना

# आठवणीतले शिक्षक




**चेतन पाटील**

अक्कलकुवा-नंदुरबार


शिक्षक दिनानिमित्त आयुष्यात आलेल्या अनेक शिक्षकांना त्रिवार वंदन. मी आज जे काय आहे.ते माझ्या गुरुजना मुळे! जीवनामध्ये अनेक चढ-उतारातून जात असताना आयुष्यात मार्गदर्शन लाभले ते शिक्षकां मुळेच माझ्या आयुष्यातील आजवर झालेल्या सर्व शिक्षकांचा मी ऋणी आहे. आजच्या दिवशी एका शिक्षकाची विशेष असे स्थान आहे. ते हे म्हणजे माझे वडील व माझे मराठीचे शिक्षक श्री. आर. डी. पाटील सर माध्यमिक शाळेत असताना त्यांनी मला मराठीचे अध्यापन केले. ते आमचे इयत्ता आठवी चे वर्गशिक्षक होते. मराठी विषय ते आवडीने आम्हाला शिकवत असत. त्यांनी शिकवलेले मराठीतले पाठ व कविता आजही आठवतात. मराठी विषयाचे व्याकरणावर त्यांचे प्रभुत्व होते. आजच्या पिढीला लाजवेल अशा स्वरूपाचे अध्यापन होते. मराठी विषयात त्यांचा हातखंडा होता. मराठी विषय शिकवत असताना पाठ किंवा कविता एवढे समरस होऊन शिकवायचे की सर्व वर्ग तो पाठ व कविता शिकत असतांना त्यांच्याबरोबर एक टक लावून ऐकत असत. आज जरी मी विज्ञान शिक्षक असलो तरी मला मराठी विषयाची आवड आहे. मराठीचे पाठ्यपुस्तक मी पाहतो त्यावेळेस आमच्या मराठीच्या शिक्षकांची आठवण मला नक्कीच होते.

माझे शिक्षक केवळ शाळे पुरतेच मर्यादित नव्हते. माझे वडील हे एक उत्तम शिक्षक होते व आहेत शिक्षक कसा असतो हे त्यांच्या जीवना कडे पाहून शिकलो. शिक्षक हा नुसता शिक्षक नसून समाजात वावरत असताना त्याला आपला शिक्षकी पेशा कशा पद्धतीने जपावा लागतो हे त्यांच्याकडून शिकलो. माझ्या आयुष्यातील आदर्श व्यक्तिमत्व म्हणजे वडील. माझे मराठीचे शिक्षक हेच आहेत. शाळेत शिस्तप्रिय तेवढेच घरीसुद्धा आम्ही सर्व भावंडे त्यांना आदराने घाबरतो तसे शाळेमध्ये सुद्धा ! मराठीचा तास आला की सर्व वर्ग एकदम शांत होऊन जायचा. व्याकरणाची वही स्वतंत्र असायची. व्याकरण चालवा पासून विग्रह समास या प्रत्येक गोष्टी बारकाईने ते आम्हाला शिकवत एवढेच नव्हे तर ते पाठांतर करायला ही सांगत. दुसऱ्या दिवशी पाठांतर आल नाही तर मात्र शिक्षा.

ते पाठ व कविता आज सुद्धा जसेच्या तसे आठवतात. कदाचित हाच त्यांचा शिक्षणातला गुण असावा.त्यांचा वारसा घेऊन शिक्षक झालो कारण माझे आदर्श ते होते.


**(चेतन रमेश पाटील हे सातपुडा वैभव विद्यालय वाण्याविहिर, ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार येथे कार्यरत.)**

# आकर्षक सापळा



डॉ.नंदा हरम
पुणे

महेश हाका मारतच घरात शिरला

आई आई,..मला विज्ञान कथेचं पुस्तक बक्षीस मिळालं..

अरे वा! .अभिनंदन,महेश! आईला आनंद झाला .मनातल्या मनात म्हणाली,मेहनती आहे ग माझं पोर...हुशार आहे माझा बाळ!

आई: मग ...आता काय आहे तुझा बेत?

महेश:अग,बेत काय! तू मला एक काम दिलं आहेस ना? ते पूर्ण करायचं आहे...

आई: लक्षात आहे तर...! तुला हे विज्ञान कथेचं पुस्तक आज वाचायचं असेल तर वाच. उदया त्या किटकभक्षी वनस्पतीची माहिती मिळव.

महेश: अगदी माझ्या मनातलं बोललीस उद्या मी बघेनच.कारण सरांनी मला सांगितलं आहे की लाजाळू आणि नाचणारं झाड यांची पानं मिटण्याची यंत्रणा आणि किटकभक्षी व्हीनस प्लाय ट्रॅपची यंत्रणा वेगळी आहे,ती शोधून काढू

आई: बरंच झालं मी मस्त गरमागरम भजी करते.ती खात-खात पुस्तक वाच

दूसऱ्या दिवशी महेश आईला हाका मारु लागला.

महेश:आई,इकडे ये.तुला कीटकभक्षी वनस्पती, व्हिनस प्लाय ट्रॅपच चित्र दाखवतो.हे बघ




आकृती क्र. १ : व्हीनस फ्लाय ट्रॅप

(आकृती क्र.१पहा)

आई:व्वा! काय छान दिसतं नाही झाड!

महेश: हो..पण किटकांकरीता साक्षात मृत्यूचा सापळा आहे तो!

आई: ही रंगीत दिसतात,ती पानं आहेत की...

महेश: बरोबर ओळखलं आई! पानंच आहेत ती.पानाचे दोन भाग असतात.देठाचा भाग चपटा,हृदयाकृती आणि प्रकाश संश्लेषण करणारा असतो.तर त्यांच्या टोकाचा दोन कानाच्या पाळीसारखे भाग,मधल्या शिरेला जोडलेले असतात.

आई: हा लाल रंग कशामुळे येतो या पानांना?

महेश: ॲथोसायनिन उया रंगद्रव्यामुळे पानाचा पृष्ठभाग लाल रंगाचा दिसतो.पानाच्या कडा श्लेष्मल द्रव (Mucilage) स्त्रवतात.

आई: आणि ते पानांच्या कडेला काय आहे,महेश!

महेश: सांगतो ना हे बघ,

(आकृती क्र.२ पहा)




आकृती क्र. २

दाखविल्याप्रमाणे दोन्ही पाळीसारख्या भागावर प्रत्येकी तीन प्रवर्धक असतात, तर कडेला रोमक असतात. जेव्हां सापळा बंद होतो,तेव्हा हे रोमक एकमेकांत घट्ट बसतात.

आई:किटक या पानांकडे कसे आकर्षित होतात?

महेश: किटक कसे फसतात बघ! लाल रंगाचं पान त्यांना फुलासारखं वाटतं व मधाच्या आशेने ते त्यावर येवून बसतात.तसेच पान उघडल्यावर त्याचा गोडसर वास सगळीकडे पसरतो.त्यामुळेच हे किटक आकर्षित होतात..

आई:या प्रवर्धक रोमांचं नेमकं काय काम,महेश?

महेश:आत्ता मी तुला सांगितलं त्याप्रमाणे किटक आकर्षित होवून पानावर येवून बसले की त्यांचा स्पर्श या प्रवर्धक रोमाला होतो.तो चेतवला जातो आणि विद्युत आवेग पानात पसरतो.कॅल्शिअम आयन्स वाढतात.जर दोन प्रवर्धक रोमांना २० सेकंदाच्या आत स्पर्श झाला किंवा एक प्रवर्धक रोमाला एक पाठोपाठ स्पर्श झाला.तरच तो सापळा एक दशांश सेकंदाच्या आत बंद होतो.आणि किटक सापळ्यात अडकतो.

आई:हे इतकं ठरलेलं असतं!

महेश: हो तर.... हीच तर निसर्गाची किमया आहे...आई...अग,वाऱ्याबरोबर एखादी गोष्ट आत येवून पडली,पाण्याचा थेंब पडला आणि त्या रोमाला त्याचा स्पर्श झाला, तर त्या पानाला चुकीचा संदेश मिळून,भक्ष्य आहे असं समजून ते बंद नाही का होणार!


आई:खरंय की रे! ऊर्जेचे बचत शिकावी तर,निसर्गाकडून!

महेश:आई,पुढे ऐक ना,नेमकं काय काय घडतं ते!

आई: सांग,सांग बाळ

महेश: आत्ता तुला सांगितलं त्याप्रमाणे दुसऱ्यांदा रोमाला किटकांचा स्पर्श झाला की पानामध्ये विद्युत आवेग पसरतो,ज्यामुळे कॅल्शीअम आयन्सची पातळी विशिष्ट मर्यादा वाढते.त्याला प्रतिसाद म्हणून तेथील पाणी वाढते.

त्यामुळे पानाचा बहिर्वक्र आकार बदलून अंतर्वक्रहोतो




(आकृती क्र.३ पहा)

म्हणजेच सापळा बंद होतो.

आई: म्हणजे..तो किटक आत अडकतो.पण,तो लगेच मरत नाही ना?

महेश: नाही तो सुटण्यासाठी धडपड करतो.त्यामुळे रोमाला त्याचा स्पर्श होत राहातो. यामुळे मिनिटाला स्पर्श झाला की सापळ्यातील कॅल्शिअमची पातळी आणखी वाढते,ज्यामुळे जास्मोनेट (Jasmonate) नावाचे संप्रेरक स्त्रवू लागते. पाचव्या विद्युत आवेगानतर या संप्रेरकामुळे सापळयातील ग्रंथीतल्या पेशी पचनाकरीता विकरं निर्माण करु लागतात.

आई: केवढं नियोजन! ऐकलं सारं की नवल वाटतं आणि हो...हे सारं संशोधकांमुळे शक्य झालं आहे.त्यांच्या

संशोधनाला,अथक परिश्रमाला त्रिवार वंदन!

महेश: अगदी खरं आहे.तुझं म्हणणं,आई!

सापळ्यामध्ये तो किटक़ ज्या प्रमाणात धडपड करेल,त्या प्रमाणात विकरं तयार होतात.जवळ–जवळ ६–७ तासानंतर सापळा अगदी हवाबंद होतो.द्रवाने पूर्ण भरतो. आत अडकलेलं भक्ष्य प्राणवायूविना तडफडून मरतं सापळ्यातील द्रवाचा सामू साधारण २ एवढा असतो.

आई: किती दिवस लागतात पचन व्हायला?

महेश: किटकाचं पूर्ण पचन व्हायला काही दिवस लागतात. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर शोषून घेण्याचं काम ही सापळाच करतो.भक्ष्यापासून मिळालेले सोडिअम आयन्स वनस्पती शोषून घेते.तसेच पाणीसुध्दा स्वत:च्या उतीमध्ये मिसळून टाकते.

आई: मग,किती दिवसांनी हा सापळा परत उघडतो?

महेश: साधारण एखाद आठवड्याने हा सापळा उघडतो.आता तो परत नवीन भक्ष्य पकडण्याकरीता तयार असतो.

आई: एक सापळा अशी किती भक्ष्यं पकडतो?

महेश : अजून १–२ भक्ष्य पकडतो आणि मग मात्र हा सापळा गळून पडतो.

आई: महेश,लाजाळूचं आणि नाचणारं झाडं,आणि हे व्हिनसप्लाय ट्रॅप मध्ये साम्य किंवा फरक काय सांगतील?

महेश : तिन्ही झाडांमध्ये पानांची हालचाल आहे,पण त्यांचा हेतू वेगळा आहे.लाजाळूमध्ये पानं मिटण्यामागचं महत्वाचं कारण संरक्षण आहे.

आई : गेल्यावेळी महेश तू म्हणालास नाचणाऱ्या झाडामध्ये संरक्षण हा हेतू असू शकतो.पण मुख्यत्वे सूर्यप्रकाश जास्त मिळावा त्याकरिता पानांची हालचाल चालते.हो ना?

महेश : अगदी बरोबर! कीटक भक्षी वनस्पतीत तर अन्न मिळवण्यासाठी सारा खटाटोप चालतो.

आई : महेश,लाजाळू आणि नाचणाऱ्या झाडांमध्ये पोटॅशिअम आणि क्लोराईड आयन्सच्या प्रवाहामुळे पाल्व्हिनसमध्ये पाण्याची हालचाल चालू होते ना?

महेश : हो..इथे व्हीनस प्लाय ट्रॅप मध्ये कॅल्शिअम आयन्सचा सहभाग आहे.आणखी एक मोठा फरक आहे.येतोय का तुझ्या लक्षात?

आई : पानं मिटण्याच्या कालवधीचा का?

महेश : बरोबर ओळखलंस ! व्हीनस प्लाय ट्रॅपमध्ये सापळा अक्षरश:एक दशांश सेकंदात बंद होतो.पण एकदा का सापळा बंद झाला की तो८–१० दिवसांनीच उघडतो.

आई: नाचणाऱ्या झाडाची पानं ३ ते ५ मिनिटं हलत रहातात ना?

महेश : हो....त्यामुळे त्यांची हालचाल सहन डोळ्यांनी टिपता येते.लाजाळूला स्पर्श केल्यापासून ४ ते ५ सेकंदात पानं मिटतात. ही पानं उघडायला मात्र वेळ लागतो,काही सेकंद किंवा अगदी १० मिनिटं सुध्दा!

आई : महेश,माहिती किती रोचक आहे नाही! आणि वैविध्य ही किती आहे...

महेश : मी मोठेपणी संशोधकच होणार आहे,आई मला सारं फार आवडतं.

आई: खुशाल....आशीर्वाद आहेत माझे!

– ९३७२९१०३०६

**मराठी मासिक**

**शिक्षणयात्री**

हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक –शैला नंदकिशोर हजारे **Reg No.**

हरवलेलं-गवसलेलं !

# हरवलेल्या पोळ्याच्या आठवणी



किरण डोंगरदिवे
मेहकर-बुलढाणा

आपले मातीचे नाते तुटले
हे मान्य करणे शक्य नसते आपल्यासाठी
किती सहज, बदलत गेला काळ
आपण बदललो हे लक्षात न येता.
खुंट्यालगतच्या ट्रॅक्टरचा लळा लागावा
इतकं यंत्रमय होऊन गेलो आपण..
रस्ते सामसूम नसतात कधीही
गोठ्यातल्या जीवघेण्या शांततेसारखे..
बैलगाडीच्या चाकाची गती थांबली तरीही
जीवनाचे कालचक्र आमर्याद वेगाने धावते आहे
रस्त्यांवर कधीही न थांबण्यासाठी...
आठवतो का माणूस भोळा
नात्यांचा झाला चोळामोळा,
खेड्यातील मजुरांची रांग न थांबता
धावत असते शहराकडे
मुंग्यांच्या अखंडित रांगेप्रमाणे
सर्व गाव खेड्यातील संबंध तोडून
माणसासोबतचे आणि प्राण्यांसोबतचेही,
नातलगासारखा बैल हसायचा रडायचा
पोळ्याचा दिवशी सालगड्या सारखा सजायचा
झुल अंगावर धन्याच्या मायेची ओढून...
पूर्वीच्या पोळ्याच्या आठवणी
मारूतीच्या पाराभोवती हरवलेल्या
शिंगाची बेगड, गळ्यातील घुंगुरमाळा
ह्यांचे उमटत राहतात निनाद
विस्मरणाच्या बाजारातून
आता बैल मिरवणुकीत दिसत नाहीत
आता तोरणाखालून बैल चालत नाहीत
वाहनाच्या गजबजलेल्या रस्त्यावरची वर्दळ
देते ग्वाही मातीशी नाळ तुटल्याची
पाळीव प्राण्यांच्या दुधातील घट्टपणावर
ठरते त्यांची उपयुक्तता
बछड्यांची उपासमार पाण्यात मिसळून
निसर्गदत्त मातृत्वाला शापग्रस्त करत...
माणूस प्राणी नाते सैल
कुत्री महाग स्वस्त बैल
शाडूच्या मातीच्या बैलांचे पुजन करावे
म्हणून पर्यावरण संरक्षक करतात आक्रंदन
खपाटीला पोट लागलेल्या खंगलेल्या बैलांच्या
शिंगाला पाटी अडकवून....
हरवला बैलांचा पोळा
विसरला मायेचा मोळा

संपर्क - ७५८८५६५५७६

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2021-23










# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये    द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये    त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

**With pay any app**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

Postal Registration No.DHL/557/2021-23

प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ................................................

.......................................................

.......................................................

Pragati Arts Shirpur 8421356261